महात्मा फुले कृषि विद्यापीठ

राहुरी - ४१३ ७२२, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र)

मे २०२६

# ई वार्ता




मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र.२९७०/२०२६

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

# मफुकृवि ई वार्ता

मे २०२६

वर्ष :६, अंक क्र. : ६५, मे, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## पुणे कृषि हॅकथॉन २०२६ मध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाला २५ लाखांचे प्रथम पारितोषिक




**दि. १९ मे, २०२६.** कृषि विभाग, महाराष्ट्र शासन आयोजित पुणे कृषि हॅकथॉन २०२६ या राज्यस्तरीय स्पर्धेत महात्मा फुले कृषि विद्यापीठाने घवघवीत यश संपादन केले. विद्यापीठाने विकसित केलेल्या संवेदक आधारित ताण विशिष्ट नत्र फवारणी यंत्र या नावीन्यपूर्ण प्रकल्पाला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते रुपये २५ लाखाचे कृषि यांत्रिकीकरण या विषयांतर्गत प्रथम पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या प्रकल्पाच्या संशोधक टीमचे सदस्य डॉ. अवधूत वाळुंज यांनी सदरचा पुरस्कार स्वीकारला. डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी डॉ. प्रणव पावसे आणि इंजि. भूमिका पांडे हे या प्रकल्पाच्या संशोधक टीमचे अन्य सदस्य असून हा प्रकल्प महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या संकल्पनेतून साकार झाला आहे. या प्रकल्पाचे मार्गदर्शक म्हणून डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे यांनी काम पाहिले. या प्रयोगासाठी स्मार्ट आणि अचूक शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञान उत्कृष्टता केंद्रातील संवेदक सुविधांचा लाभ झाला.

पिकांच्या गरजेनुसार आवश्यक तिथेच मोजून मापून नत्राची मात्रा देणे या तंत्रज्ञानामुळे शक्य होणार आहे. यामुळे नत्राच्या खतात बचत होऊन संतूलीत खतांचा वापर होईल. यामुळे शेतकऱ्यांचा नत्रयुक्त खतांवरील खर्च कमी होऊन पर्यावरणाचेही रक्षण होईल. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या या संशोधक टीमच्या ऐतिहासिक यशाबद्दल विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी विजयी संघाचे विशेष अभिनंदन केले आहे.

## कृषि महाविद्यालय, पुणे येथे कृषि नवोन्मेष आणि उष्मायन केंद्र प्रकल्पाचे भूमिपूजन संपन्न



**दि. १८ मे, २०२६.** पुणे कृषि महाविद्यालयामध्ये उभारण्यात येणाऱ्या कृषि नवोन्मेष आणि उष्मायन केंद्र या प्रकल्पाचे भूमिपूजन राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. याप्रसंगी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा. ना. श्री.चंद्रकांत दादा पाटील,

राज्याचे कृषिमंत्री तथा महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे प्रतिकूलपती मा. ना. श्री. दत्तात्रय भरणे, राज्यसभेच्या खासदार श्रीमती मेधा कुलकर्णी, विधान परिषद सदस्य आमदार श्री. योगेश टिळेकर, विधानसभा सदस्य आमदार श्री. हेमंत रासने, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक श्री. राहुल महिवाल, कृषि आयुक्त श्री. सुरज मांढरे (भाप्रसे), पुणे जिल्हाधिकारी श्री. जितेंद्र डुडी (भाप्रसे) आणि जिल्हा परिषद पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गजानन पाटील (भाप्रसे), पुणे जिल्हा परिषद, कृषि पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीचे सभापती श्री. अमोल नलावडे, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे, कार्यकारी परिषदेचे सदस्य श्री. दत्तात्रय उगले, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. इंद्रमणी, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, कृषि विभागाचे विभागीय कृषि सहसंचालक श्री. दत्तात्रय गवसाने, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, सहयोगी संशोधन संचालक डॉ. डी.बी. लाड, आत्मा, प्रकल्प संचालक श्री. सुरज मडके आणि पुणे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. संजय काचोळे उपस्थित होते. गेल्या वर्षी आयोजित ॲग्री हॅकथॉन कार्यक्रमादरम्यान मा. मुख्यमंत्री महोदयांनी कृषि महाविद्यालय, पुणे येथे कृषि नवोन्मेष आणि उष्मायन केंद्र स्थापन करण्याची घोषणा केली होती. या गोष्टीच्या पूर्ततेच्या दिशेने महत्वपूर्ण पाऊल उचलत मा. जिल्हाधिकारी, पुणे श्री. जितेंद्र डुडी यांच्या मार्गदर्शनातून या उपक्रमासाठी जिल्हा नियोजन व विकास समितीच्या निधीतून कृषि महाविद्यालय परिसरातील ऐतिहासिक वारसा लाभलेल्या इमारतीच्या नूतनीकरणासाठी व संवर्धनासाठी सुमारे चार कोटी १७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

यावेळी मार्गदर्शन करतांना महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे येथे उभारण्यात येणारा कृषि नवोन्मेष आणि उष्मायन केंद्र हा प्रकल्प राज्याच्या कृषि क्षेत्रातील नवसंशोधन आणि कृषि उद्योजकतेच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा असेल. या केंद्राच्या माध्यमातून जे संशोधन विस्तारक्षम, विक्री योग्य तसेच उत्पादन वाढीसाठी उपयुक्त ठरेल अशा संशोधनास सर्वतोपरी उपयोगी ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी या केंद्राची मुख्य उद्दिष्टे व भूमिका विषद करत असताना हे केंद्र तंत्रज्ञान व्यापारीकरण, कृषि क्षेत्रातील कृषि विद्यापीठे आणि संशोधन संस्थांमध्ये विकसित झालेल्या नवीन तंत्रज्ञानाचे पेटंट मिळवणे, त्याचे प्रमाणीकरण करणे आणि ते बाजारात आणण्यासाठी मदत करणे, नवोदित उद्योजकांना (स्टार्टअप्सना) उद्योग क्षेत्रातील तज्ञ, कृषि वैज्ञानिक आणि व्यावसायिक सल्लागारांना जोडून देणे, पायाभूत सुविधा पुरवणे, तसेच कृषि विद्यापीठे, कार्पोरेट कंपन्या, सरकारी धोरणकर्ते आणि शेतकरी उत्पादक कंपन्या यांच्यात समन्वय साधणारा दुवा म्हणून हे केंद्र काम करील अशी ग्वाही दिली. अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांनी या केंद्राच्या माध्यमातून कृषि क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच विविध तंत्रज्ञान जसे मशीन लर्निंग, हवामान बदल, अनुकूल शेती परिसंस्था, अचूक शेतीचे घटक जसे ड्रोन व प्रगत पाणीपुरवठा, जैव व जैविक शेती, प्रगत शेती अवजारे, कार्बन क्रेडिट, व्यापार तंत्रज्ञान, शाश्वत शेती आणि कृषि आधारित आर्थिक तंत्रज्ञान या नवसंकल्पनेचा विस्तार इ. मुख्य लक्ष असतील असे नमूद केले. कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुभाष भालेकर यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. यावेळी पुणे येथील महाराष्ट्र कृषि तंत्रज्ञ संस्थेचे अध्यक्ष व डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे माजी मा. कुलगुरू डॉ. किसन लवांडे, कार्यकारी अध्यक्ष व माजी कृषि आयुक्त डॉ. उमाकांत दांगट, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला माजी मा. कुलगुरू डॉ. वेंकट मायंदे, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे माजी मा. कुलगुरू डॉ. राजाराम देशमुख आणि या संस्थेचे महासचिव व माजी संचालक (निविष्ठा व गुणवत्ता नियंत्रण) डॉ. सुदाम अडसूळ तसेच कृषि महाविद्यालय पुणेचे प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मा.ना.श्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते कृषि विद्यापीठाच्या संतुलित खत वापर भित्तीपत्रकाचे विमोचन

**दि. १७ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या संकल्पनेतून विद्यापीठाने केंद्र शासनाच्या धोरणाला अनुरूप संतुलित खत वापर या विषयावरील भित्तीपत्रक शेतकरी बांधवांसाठी तयार केले आहे. या भित्तीपत्रकात एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाचे महत्त्व, माती परीक्षण, शाश्वत मृद आरोग्यासाठी सेंद्रिय खतांचा वापर, जैविक खतांचा वापर, हिरवळीच्या खतांचे फायदे, रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी उपाययोजना, विद्राव्य खतांचा वापर, रासायनिक खत वापरायची पंचसूत्री, सेंद्रिय खतांचा एकात्मिक वापर, आंतरपीक, पीक फेरपालट या महत्त्वाच्या बाबी दिलेल्या आहेत.अहिल्यानगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित खरीप हंगाम नियोजन व आढावा बैठकीत या महत्त्वपूर्ण भित्तिपत्रकाचे विमोचन राज्याचे जलसंधारण मंत्री आणि अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी आ. श्री. अमोल खताळ, आ.श्री. विठ्ठल लंघे, आ. श्री. विक्रम पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. सुधाकर बोराळे तसेच जिल्ह्यातील विविध विभागांचे प्रमुख



उपस्थित होते. विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ. रवी आंधळे, डॉ. पंडित खर्डे, डॉ. संजय तोडमल आणि प्रा. अन्सार खान आत्तार यांची उपस्थिती होती. सद्यस्थितीत शेतकऱ्यांनी येत्या खरीप हंगामात पिकांना संतुलित खत व्यवस्थापन योग्य प्रकारे करण्याचे आवाहन महात्मा फुले कृषि विद्यापीठाने केले आहे. जिल्ह्याच्या खरीप हंगाम नियोजन व आढावा बैठकीत विद्यापीठाच्या संचालकांनी ही बाब माननीय मंत्री महोदय आणि उपस्थित यांच्या निदर्शनास आणून याविषयी प्रचार आणि प्रसार करण्यासाठी संतुलित खत वापरासाठी भित्तीपत्रकाचे महत्व विषद केले. माननीय मंत्री महोदयांनी या उपक्रमाचे कौतुक करून कृषि विभागाला ही भित्तिपत्रके गावोगावी प्रदर्शित करण्याच्या सूचना दिल्या. सदर बैठकीत संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांनी खरीप हंगामासाठी विद्यापीठात उपलब्ध असलेल्या बियाणे, जैविक खते याविषयीची माहिती दिली. विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी माननीय मंत्री महोदय आणि उपस्थितांना विद्यापीठाची प्रकाशने दिली.

## कोल्हापूरचे पालकमंत्री मा. ना. श्री. प्रकाश आबिटकर यांच्या शुभहस्ते संतुलित खत वापर जागरूकता अभियान २०२६ माहितीपत्रिकेचे विमोचन संपन्न





**दि. ११ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर यांच्या वतीने संतुलित खत वापर जागरूकता अभियान २०२६ राबविण्यात आले. या अभियानासाठी तयार करण्यात आलेल्या माहितीपत्रिकेचे विमोचन कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. प्रकाश आबिटकर यांच्या शुभहस्ते जिल्हाधिकारी कार्यालयातील महाराणी ताराराणी सभागृह येथे आयोजित खरीप आढावा बैठकीदरम्यान करण्यात आले. सदर माहितीपत्रिका महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी खासदार श्री. धैर्यशील माने, आमदार श्री. राजेंद्र यड्रावकर, आमदार श्री. राहुल आवारे, आमदार श्री. शिवाजी पाटील, कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भरूड, पोलीस अधीक्षक डॉ.निलोप्पल, जिल्हा परिषदेचे मुख्य

वर्ष :६, अंक क्रं. : ६५, मे, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

कार्यकारी अधिकारी डॉ. जास्मिन व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. जालिंदर पांगिरे उपस्थित होते.

यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात मा. ना. श्री. प्रकाश आबिटकर यांनी संतुलित खत वापराचे महत्त्व, माती परीक्षणाची आवश्यकता तसेच शाश्वत शेतीसाठी योग्य अन्नद्रव्य व्यवस्थापनाची गरज याबाबत अधिकारी व संबंधित विभागांना मार्गदर्शन केले. विद्यापीठाने तयार केलेल्या या माहितीपत्रिकेचा सर्वांनी वापर करावा व शेतकऱ्यांपर्यंत याचा प्रसार करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी शेंडा पार्क येथील विभागीय कृषि संशोधन केंद्राचे सहयोगी सहयोगी संशोधन संचालक डॉ. सुनील कराड यांनी सांगितले की सदर माहितीपत्रिकेमध्ये एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, माती परीक्षणाचे महत्त्व, शाश्वत शेती आरोग्यासाठी सेंद्रिय शेतीचे योगदान, जैविक व हिरवळीच्या खतांचा वापर तसेच रासायनिक खतांचा कार्यक्षम वापर याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. शेतकरी बांधवांना खत व्यवस्थापनामध्ये या माहितीपत्रिकेचा मोठा लाभ होणार असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या माहितीपत्रिकेचा वापर करावा असे आवाहन केले. याप्रसंगी विभागीय कृषि संशोधन केंद्राचे डॉ. सुहास भिंगारदेवे, डॉ. शैलेंद्र वाळे, डॉ. मयूर सुतार तसेच श्री. सागर शेळके उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात ६७ वा महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा








**दि. १ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठात ६७ वा महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता (कृषि) डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, कुलसचिव श्री. राजेंद्रकुमार पाटील, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, नियंत्रक डॉ. बी.टी. पाटील, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे व कृषि तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजू अमोलिक उपस्थित होते. विद्यापीठाने संशोधन, शिक्षण व विस्तार या तीनही क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी केली आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने संशोधनामध्ये गेल्या वर्षी शेतकऱ्यांना उपयोगी ठरणाऱ्या विविध पिकांच्या ७ वाणांची निर्मिती, ३ कृषि अवजारे व यंत्रांची निर्मिती व ५९ तंत्रज्ञान शिफारशी विद्यापीठाने दिल्या आहेत. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध कृषि महाविद्यालये, कृषि तंत्र विद्यालये याद्वारे दर्जेदार कृषि शिक्षणाचे काम सुरू आहे. कृषि विस्तार कार्यामध्ये आपण विविध उपक्रम आयोजित करत असतो. यावर्षी यामध्ये फुले कृषि महोत्सवाचे यशस्वी आयोजन केलेले आहे तसेच दहा जिल्ह्यांमध्ये मॉडेल व्हिलेज विकसित करण्याचा मानस आहे. विद्यापीठाने ६९०० क्विंटल बियाणे उत्पादन करून बीज्योत्पादनाच्या उद्दिष्टामध्ये मोठी प्रगती साधलेली आहे. यावर्षी एल नीनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहणार असल्याचे संकेत आहेत तरी या दृष्टीने आपल्या तंत्रज्ञानाच्या वापराने शेतीची उत्पादकता कशी वाढेल यासाठी विद्यापीठ सज्ज असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले.

विद्यापीठात झालेल्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमास विविध विभागांचे विभाग प्रमुख, अधिकारी, शास्त्रज्ञ, विद्यार्थी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्षनाथ शेटे यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मे २०२६
मफुकृवि ई वार्ता

# महात्मा फुले कृषि विद्यापीठात बियाणे उत्पादन आढावा व खरीप २०२६-२७ च्या बियाणे व इतर निविष्ठांच्या नियोजनासंबंधीची बैठक संपन्न





**दि. ११ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे बियाणे उत्पादन आढावा व खरीप हंगामासाठीची बियाणे उत्पादनासंबंधीची नियोजन बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे होते. या बैठकीच्या उपाध्यक्षपदी संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके होते. याप्रसंगी विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता (कृषि) डॉ. साताप्पा खरबडे व नियंत्रक श्री. सदाशिव पाटील, बैठकीचे निमंत्रक प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) डॉ. नरेंद्र काशीद उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाने सन २०२५-२६ मध्ये विविध पिकांचे ८४५६ क्विंटल बियाणे तयार केले. पुढील वर्षी सुमारे ८६३७ क्विंटल बियाणे निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून यामुळे शेतकऱ्यांना विविध पिकांच्या वाणांचे सत्यप्रत बियाणे मोठ्या प्रमाणात उपलब्ध होईल. बिजोत्पादन हे विद्यापीठाचे महत्वाचे उद्दिष्ट्य आहे. शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात उत्कृष्ट बियाणे उपलब्ध होण्यासाठी जास्तीत जास्त बीजोत्पादन घेणे हे विद्यापीठाचे उद्दिष्ट असले पाहिजे. हे करत असताना जमिनीची सुपीकता टिकून ठेवण्यासाठी पुरेशा प्रमाणात जैविक खते तसेच कंपोस्ट खते द्यायला हवीत असे यावेळी ते म्हणाले. बैठकीच्या सुरुवातीला डॉ. नरेंद्र काशीद यांनी स्वागत तर डॉ. प्रशांत बोडके यांनी विद्यापीठ तयार करत असलेल्या विविध पिकांच्या बियाण्यांसंदर्भात सविस्तर माहिती दिली. यावेळी कृषिविद्या विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. आर. पी. आंधळे यांनी एल निनोचा येत्या खरीप हंगामावर पडणारा प्रभाव, कृषि संशोधन केंद्र, जळगाव येथील तीळ पैदासकार डॉ. एस. डी. राजपूत यांनी तीळ, मूग व उडीद उत्पादन तंत्रज्ञान, कृषि संशोधन केंद्र, कसबे डिग्रज येथील सोयाबीन पैदासकार डॉ. ए. बी. राजगुरू यांनी सोयाबीन उत्पादन तंत्रज्ञान, डॉ. नरेंद्र काशीद यांनी भात उत्पादन तंत्रज्ञान व कडधान्य सुधार प्रकल्पातील डॉ. महेश भारती यांनी तूर उत्पादन तंत्रज्ञान यावर सादरीकरण केले. बीज उत्पादन अधिकारी डॉ. कैलास गागरे यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शेतपिकांच्या बीज उत्पादन कार्यक्रमांचे सादरीकरण केले. डॉ. ज्ञानेश्वर क्षीरसागर यांनी भाजीपाला बीज उत्पादन व डॉ. बी.टी. पाटील यांनी फळ पिकांच्या रोपे उपलब्धीचे सादरीकरण केले.

याप्रसंगी डॉ. राजेंद्र भिलारे यांनी विद्यापीठांतर्गत राबविण्यात येत असलेल्या ऊस बिजोत्पादन त्याचप्रमाणे डॉ. उत्तम कदम, डॉ. आर. टी. गायकवाड, डॉ. भीमराज कांबळे या विभाग प्रमुखांनी त्यांच्या विभागांतर्गत उत्पादित विविध फळे पिकांच्या रोपांची उपलब्धता, जैविक खते, जैविक औषधे, सूक्ष्म अन्नद्रव्ये तसेच डॉ. उल्हास गायकवाड यांनी गांडूळ खताचे निर्मितीबाबत माहिती दिली. याप्रसंगी बियाणे विभागाच्या बोधचिन्हाचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. यावेळी यावर्षांमध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे, कोल्हापूर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र कांबळे, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विजय शेलार, इगतपुरी येथील सहयोगी संशोधन संचालक डॉ. हेमंत पाटील, गवत संशोधन योजनेचे संशोधन अधिकारी डॉ. लक्ष्मण तागड, कृषिविद्या विभागांतर्गत असलेल्या रोपवाटिकेचे प्रभारी अधिकारी प्रा. मंजाबापू गावडे व मोहोळ येथील कृषि संशोधन केंद्रातील कृषि सहाय्यक श्री. पोळ या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सत्कार करण्यात आले. ही आढावा बैठक यशस्वी करण्यासाठी डॉ. कैलास भोईटे, प्रा. बी.टी. शेटे, डॉ. अनिल सूर्यवंशी, डॉ. अविनाश कर्जुले, डॉ. बी.जी. राठोड, श्री. आदिनाथ ढगे, श्री. संदीप कोकाटे व बियाणे विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या आढावा बैठकीचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. डी. डी. गायकवाड यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

मे २०२६

## कृषि महाविद्यालय, धुळे येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांची भेट संतुलित खत वापर जागृकता अभियान -२०२६ अतर्गत भित्तीपत्रिकेचे अनावरण





**दि. ६ मे, २०२६.** धुळे येथील शासकीय कृषि महाविद्यालयाला महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी भेट दिली. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बी.एम. इल्हे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, मुक्ताईनगर, जि. जळगाव येथील कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील, महाविद्यालयाच्या पशु विज्ञान विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. राहुल देसले, कृषि अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. विश्वनाथ शिंदे व कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. दिनेश नांद्रे उपस्थित होते.

यावेळी मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे मार्गदर्शन करतांना म्हणाले की विद्यापीठातील संशोधनाचा फायदा शेवटच्या घटकापर्यंत झाला पाहिजे. आगामी काळामध्ये शेतीसमोर अनेक आव्हाने आहेत. त्यामध्ये संतुलित खतांचा वापर महत्त्वाचा असून त्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विद्यापीठ संतुलित खत वापर जागरूकता अभियान-२०२६ राबवत आहे. विद्यापीठाच्या प्रयोगशाळेतील तंत्रज्ञान थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवण्यासाठी शास्त्रज्ञांनी नाविन्यपूर्ण विस्तार पद्धतीचा वापर करावा. की हवामान अनुकूल शेती, नैसर्गिक शेतीचा प्रसार आणि एकात्मिक शेती पद्धतीवर आपण भर द्यायला हवा. ग्रामीण युवकांना शेतीकडे वळवण्यासाठी कृषि उद्योजकता विकास, शेतकरी उत्पादक कंपन्यांना तांत्रिक पाठबळ आणि फुले समृद्धी गाव संकल्पनेच्या प्रभावी अंमलबजावणीची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. याप्रसंगी संतुलित खत वापर जागरूकता अभियान-२०२६ या भित्तीपत्रिकेचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी महाविद्यालयाच्या सर्वांगीण शैक्षणिक, संशोधन तसेच विस्तार कार्याचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी महाविद्यालयाच्या विविध विभागात भेटी देऊन मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयाबरोबरच बाजरी संशोधन केंद्र, कृषि विज्ञान केंद्र येथे भेट देऊन तेथील आढावा त्यांनी घेतला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बी.एम. इल्हे यांनी प्रास्ताविक करून महाविद्यालयातील विविध उपक्रमांचा आढावा सादर केला. डॉ. राहुल देसले यांनी महाविद्यालयातील विविध शैक्षणिक बाबींचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. जगदिश काथेपुरी यांनी केले तर आभार डॉ. विकास पवार यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्रकल्प समन्वयक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात कांदा आणि लसूण विषयावर १७ व्या राष्ट्रीय वार्षिक बैठकीचे उद्घाटन संपन्न

**दि. १२ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील डॉ. नानासाहेब पवार सभागृहात कांदा आणि लसूण पिकावरील १७ व्या वार्षिक बैठकीच्या उद्घाटनप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे होते. याप्रसंगी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे माजी मा. कुलगुरू डॉ. के. ई. लवांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पुणे येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषद अंतर्गत असलेले राष्ट्रीय कांदा व लसूण संशोधन केंद्राचे माजी संचालक डॉ. विजय महाजन व नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे माजी सहाय्यक महासंचालक व उद्यानविद्या विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. विक्रमादित्य पांडे हे उपस्थित होते. याप्रसंगी राजगुरुनगर जि. पुणे येथील कांदा-लसूण संशोधन केंद्राचे संचालक डॉ. राम दत्ता, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. सातापा खरबडे आणि उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी. टी. पाटील उपस्थित होते.







यावेळी मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना म्हणाले की महाराष्ट्रामध्ये कांदा पिकाचे ४०% क्षेत्र हे महात्मा फुले कृषि विद्यापीठाने संशोधित केलेल्या कांद्याच्या फुले समर्थ या वाणाखाली असून रब्बी हंगामासाठी फुले स्वामी हा वाण प्रसारित करण्यात आला आहे. कांदा व लसूण या पिकांमधील निर्यातक्षम वाणासाठी रंग, साईज व टिकवणक्षमता यावर अधिक काम करण्याची गरज आहे. आपल्याला काटेकोरपणे खते व औषधांचा वापर करण्यासाठी कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर करणे आवश्यक आहे. कांदा पिकाच्या अधिक उत्पादनासाठी खतांचा अचूक वापर व जमिनीची सुपीकता वाढविणे या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. ड्रोन तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून कांदा पिकामध्ये खते व औषधे फवारणीचे तंत्र विकसित करावे लागेल. डॉ. के.ई. लवांडे आपल्या भाषणात म्हणाले की उत्पादन घेतांना प्रत्येक वाणांनुसार दर्जा, एकसारखा आकार व रंग यावर भर द्यायला हवा. निर्यातक्षम वाणांसाठी प्रोटोकॉल तयार करणे, उत्पादन खर्च कमी करण्यासाठी यांत्रिकीकरणाचा वापर वाढविणे, साठवणुकीदरम्यान नुकसान कमी करणे यासाठी ए.आय.चा वापर या गोष्टींवर भर देणे गरजेचे आहे. कांद्याचे जास्त उत्पादन होणे हा काही गंभीर प्रश्न नाही परंतु जास्त उत्पादनाचे नियोजन करायला हवे की किती मालावर प्रक्रिया करायची, निर्यात किती करायची व पुढील हंगामासाठी बियाणे म्हणून वापर किती करायचा या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. डॉ. विजय महाजन आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की कांदा व लसूण या पिकांमध्ये संशोधन करताना निर्यातक्षम वाण तयार करणे, जमिनीच्या प्रकारानुसार शिफारशी देणे, सर्व वाणांचे कॅटलॉग तयार करणे, काटेकोर पद्धतीने खतांचे नियोजन व मशीन लर्निंगचा वापर या गोष्टी कांदा लसूण संशोधन केंद्राने प्रामुख्याने विचारात घ्याव्यात. मधमाश्यांच्या पुरेशा संख्येअभावी कांदा बीजोत्पादनावर मोठा परिणाम होत असल्याचे ते म्हणाले.

डॉ. विक्रमादित्य पांडे आपल्या भाषणात म्हणाले की बियाणे उत्पादन कार्यक्रम तसेच बियाणे संवर्धन कार्यक्रम यावर जास्त भर द्यायला हवा. बिजोत्पादनाचे व्यापारीकरण करण्यासाठी विविध कंपन्यांबरोबर सामंजस्य करार करायला हवेत, जेणेकरून कांदा बियाण्याची उपलब्धता मोठ्या प्रमाणात होईल. डॉ. प्रशांत बोडके आपल्या स्वागतपर भाषणात म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाने आत्तापर्यंत विविध पिकांचे ३२० वाण, ५६ कृषि यंत्रे व अवजारे तसेच २००० पेक्षा जास्त तंत्रज्ञान शिफारशी दिल्या आहेत. कांदा पिकाचे फुले समर्थ व फुले स्वामी वाणांचे दरवर्षी १५ टनांपेक्षा जास्त बिजोत्पादन घेतले आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. राम दत्ता यांनी प्रकल्प संचालकांचा अहवाल सादर केला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकाशनांचे विमोचन करण्यात आले. राहुरी येथील भाजीपाला सुधार प्रकल्पाला भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचा भारतातील उत्कृष्ट केंद्र पुरस्कार मिळाल्याबद्दल याप्रसंगी उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी.टी. पाटील व त्यांच्या टीमचे अभिनंदन करण्यात आले. या दोन दिवसीय बैठकीमध्ये अनुवंशीक संसाधने आणि पीक सुधारणा, पीक उत्पादन व पीक संरक्षण या विषयांवरील तांत्रिक चर्चासत्रे होणार आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजेंद्र क्षीरसागर यांनी तर आभार डॉ. बी.टी. पाटील यांनी मानले. या दोन दिवसीय आढावा बैठकीसाठी १८ राज्यातील १०० पेक्षा जास्त शास्त्रज्ञ सहभागी झाले आहेत.

## कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र येथे एनसीडीइएक्स टिकर बोर्ड उद्घाटन कार्यक्रम संपन्न

**दि. १५ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राच्या दर्शनीय भागात एनसीडीइएक्स टिकर बोर्ड बसविण्यात आला. यावेळी टिकर बोर्डचे उद्घाटन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र हिले, प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. सचिन सदाफळ तसेच कृषि अर्थशास्त्र विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे मार्गदर्शन करतांना म्हणाले की कृषि मालाच्या किंमतीबाबत पारदर्शक आणि रियल–टाईम माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्यासाठी एनसीडीइएक्स टिकर बोर्ड अत्यंत प्रभावी साधन ठरु शकते. भारतामध्ये कृषि मालांच्या किमतींची पारदर्शक माहिती उपलब्ध करून देण्यासाठी नॅशनल कमोडिटी अँड डेरीवेटीव्हज एक्सचेंज लिमिटेड (एनसीडीइएक्स) हे एक अग्रगण्य कमोडिटी एक्सचेंज म्हणून कार्यरत आहे. या माध्यमातून विविध कृषि उत्पादनांचे दर निश्चित होतात आणि व्यवहार अत्यंत पारदर्शक पद्धतीने पार पडतात. मात्र आजही ग्रामीण भागातील अनेक शेतकरी व शेतकरी उत्पादक कंपन्यांना बाजारातील अद्ययावत दरांची माहिती वेळेवर उपलब्ध होत नसल्याने योग्य वेळी विक्री न केल्याने त्यांच्या उत्पन्नावर प्रतिकुल परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर कृषि विज्ञान केंद्र, कृषि बाजार समिती आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना त्यांच्या स्तरावर टिकर बोर्ड बसविणे ही काळाची गरज असून ती एक अत्यंत उपयुक्त व प्रभावी योजना ठरू शकते असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले.

कृषि अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हिले यांनी स्पष्ट केले की, टिकर बोर्डमुळे शेतकऱ्यांना थेट चालू बाजारभाव आणि भविष्यातील शेतमालाच्या भावाचे सौदे समजतील, ज्यामुळे दलालांवरील अवलंबित्व कमी होईल. या सुविधेमुळे शेतकऱ्यांना योग्य वेळी योग्य बाजारपेठेत माल विक्रीचा निर्णय घेणे सुलभ होईल आणि एफपीओंची सौदेबाजीची क्षमता वाढेल. तसेच, फ्युचर मार्केट आणि हेजिंगच्या माहितीमुळे शेतकऱ्यांना उत्पादन साठवणूक व पीक नियोजन अधिक शास्त्रीय पद्धतीने करणे शक्य होऊन शेती नफ्याची होईल. टिकर बोर्ड हे केवळ एक डिजिटल साधन नसून ते शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाचे एक महत्त्वाचे माध्यम आहे. अचूक बाजार माहितीच्या आधारे शेतकरी आणि एफपीओंनी बाजारातील जोखीम कमी करुन शेती अधिक नफ्याची आणि शाश्वत करण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन मा. कुलगुरुंनी यावेळी केले.

## खतांचा संतुलित वापर जागरूकता अभियान २०२६ अंतर्गत विद्यापीठातील शास्त्रज्ञांचे शेतकरी मेळाव्यात मार्गदर्शन



**दि. १९ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांमध्ये खतांचा संतुलित वापर याविषयी जागरूकता निर्माण व्हावी या उद्देशाने अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

वर्ष :६, अंक क्र. : ६५, मे, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

येथील मृदाशास्त्र विभाग व आंतरविद्या शाखा जलसिंचन व्यवस्थापन विभागामार्फत श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मृदाशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. भीमराव कांबळे, आंतरविद्याशाखा जलसिंचन व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. विजयकुमार पाटील, मृदशास्त्रज्ञ डॉ. आनंद जाधव, डॉ. सुभाष घोडके, डॉ. गणेश शेळके, जलसिंचन आणि निचरा अभियंता डॉ. देविदास खेडकर व कृषि अधिकारी श्रीमती पौर्णिमा गाढे उपस्थित होते.

यावेळी डॉ. भीमराव कांबळे यांनी आगामी खरीप हंगामात युरिया व इतर रासायनिक खतांना पर्यायी उपाय काय करता येतील याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. विजयकुमार पाटील यांनी पिकांच्या वाढीच्या अवस्थेनुसार अन्नद्रव्य व्यवस्थापनाबाबत माहिती दिली. डॉ. आनंद जाधव यांनी माती परीक्षण अहवालाधारित आणि अपेक्षित पीक उत्पादन सूत्रांच्या आधारे शेतकऱ्यांनी विविध पिकांसाठी खतांच्या मात्रा कशा द्याव्यात याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. सुभाष घोडके यांनी ऊस पिकासाठी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करताना ऊस पिकासाठी खतांचे वेळापत्रक, सरळ रासायनिक खते उपलब्ध नसल्यास पर्यायी संयुक्त खते कोणती वापरावीत, रासायनिक खतांचा वापर कमी करून अन्नद्रव्य व्यवस्थापनासाठी कंपोस्ट खते, हिरवळीचे खते, जिवाणू खते इत्यादी खतांचा एकात्मिक वापर करून अपेक्षित उत्पादन कसे घ्यावे याबाबत मार्गदर्शन केले. पढेगाव येथील प्रगतशील शेतकरी श्री. शंकरराव चौधरी यांनी विद्यापीठाचे अपेक्षित उत्पादन आधारित खतमात्रा व्यवस्थापन याबाबत त्यांनी स्वतःच्या शेतावर घेतलेल्या गहू ऊस पिकावरील यशस्वी उत्पादनाचे अनुभव यावेळी सांगितले. सहाय्यक कृषि अधिकारी श्री. आदिनाथ धुमाळ यांनी सूत्रसंचालन केले. श्री. गोरक्षनाथ बडदे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी वरिष्ठ संशोधन सहाय्यक डॉ. शुभांगी कदम, कृषि सहाय्यक श्री. शेषराव देशमुख, कृषि विभागाच्या सहाय्यक कृषि अधिकारी श्रीमती जे. एन. वाडेकर, श्रीमती सी.एस. क्षीरसागर तसेच प्रगतशील शेतकरी श्री. योगेश शहाणे, श्री. किशोर कुऱ्हे, श्री. दादासाहेब कुताळ, श्री. शिवाजी कोरे, श्री. राधाकिसन राजूळे, श्री. विनय भगत, श्री. ज्ञानदेव भगत व परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची बैठक संपन्न



**दि. २५ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे मृदा विभाग अंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित माती परीक्षण पीक प्रतिसाद संशोधन प्रकल्पाच्या शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची बैठक आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मृद विज्ञान विभाग प्रमुख डॉ. भीमराव कांबळे होते. याप्रसंगी आंतरविद्याशाखा जल व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. विजय पाटील, मृदा रसायनशास्त्रज्ञ डॉ. आनंद जाधव, पढेगाव येथील प्रगतशील शेतकरी श्री. शंकरराव चौधरी व मानोरी येथील प्रगतशील शेतकरी कृषिभूषण डॉ. दत्तात्रय वने उपस्थित होते.

यावेळी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. भीमराव कांबळे म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनानुसार शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. शेती करत असताना शेतकऱ्यांच्या काही अडचणी किंवा सूचना असतात. त्या अडचणी सोडविण्यासाठी तसेच त्यांच्याकडून आलेल्या सूचना, याच्यावर विचार करून शेती किफायतशीर कशी करता येईल यावर विचारमंथन करण्यासाठी या बैठकीचे आयोजन केले आहे. विद्यापीठाचे तंत्रज्ञान आपल्या शेतात वापरून जास्तीत जास्त उत्पादन कसे घेता येईल व शेतीफायद्यामध्ये कशी येईल ही अपेक्षा असल्याचे डॉ. भीमराव कांबळे यांनी सांगितले. याप्रसंगी डॉ. आनंद जाधव यांनी मृदा आरोग्य व्यवस्थापन, मृदा परीक्षण व सिंचन पाणी परीक्षण, डॉ. नंदकुमार भुते यांनी

कपाशीवरील किडींचे एकात्मिक व्यवस्थापन या विषयांवर उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शास्त्रज्ञांनी या बैठकीसाठी उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. आनंद जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शुभांगी कदम यांनी तर आभार डॉ. श्रीगणेश शेळके यांनी मानले. या बैठकीसाठी मृदा शास्त्रज्ञ डॉ. शितल ताटपूरकर तसेच बेलापूर, माळेगाव, बोधेगाव, पढेगाव व मानोरी येथील प्रगतशील शेतकरी उपस्थित होते. या बैठकीच्या यशस्वीतेसाठी मृदविभागाचे श्री. राजेंद्र शिंदे, श्री. मोहसीन शेख, श्रीमती अर्चना घाडगे व श्रीमती रोहिणी वाघ यांनी परिश्रम घेतले.

## मातापुर येथे ऊस उत्पादन तंत्रज्ञान व खरीप पूर्व नियोजन मार्गदर्शन मेळावा संपन्न



**दि. २७ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीरामपूर तालुक्यातील मातापुर येथे ऊस उत्पादन तंत्रज्ञान आणि खरीप पूर्व नियोजन या विषयांवर मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आंतरविद्या शाखा जलसिंचन व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. विजयकुमार पाटील यांच्या प्रयत्नातून या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मृदशास्त्रज्ञ डॉ. सुभाष घोडके, उपविभागीय कृषि अधिकारी श्री. प्रवीण गोसावी, तालुका कृषि अधिकारी श्री. उल्हास राक्षे, कृषि अधिकारी श्रीमती पौर्णिमा गाढे, उप कृषि अधिकारी श्री. रियाज शेख, कृषि सहाय्यक श्री. शेषराव देशमुख उपस्थित होते.

यावेळी डॉ. सुभाष घोडके यांनी ऊस उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर मार्गदर्शन करताना ऊस पिकाचे विविध वाण, त्यांची वैशिष्ट्ये, आंतरमशागत, पाणी व्यवस्थापन आणि खत व्यवस्थापन यावर सविस्तर मार्गदर्शन केले. या चर्चासत्रादरम्यान शेतकऱ्यांच्या विविध शंकांचे निरसनही करण्यात आले. खरीप पूर्व नियोजन या विषयावर बोलताना श्री. प्रवीण गोसावी यांनी भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार एल निनोच्या प्रभावामुळे आगामी खरीप हंगामात सरासरीच्या ८८% पाऊस होण्याची शक्यता असल्याचे सांगितले. कमी पर्जन्यमानाची शक्यता लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी मठ, मूग यासारखी कमी कालावधीची पिके घेण्याचा सल्ला त्यांनी यावेळी दिला. पाण्याचा ताण सहन करणाऱ्या खरीप पिकांच्या वाणांची निवड करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी सहाय्यक कृषि अधिकारी तृप्ती तनपुरे यांनी बियाण्याची उगवण क्षमता तपासण्याबाबत प्रात्यक्षिक सादर केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रगतशील शेतकरी श्री. भगिनाथ शिरोळे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी परिसरातील प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या पौष्टीक तृणधान्य प्रकल्पांतर्गत शिवार फेरी व नाचणी पीक प्रात्यक्षिक कार्यक्रम संपन्न

## संतुलित खत वापर जागृकता अभियान -२०२६ अंतर्गत भित्तीपत्रिकेचे विमोचन

**दि. २९ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि विद्यापीठ आणि कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या पौष्टिक तृणधान्य प्रकल्पांतर्गत शिवार फेरी व नाचणी पीक प्रात्यक्षिके या कार्यक्रमाचे आयोजन श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण येथील प्रगतीशील शेतकरी श्री. सलीम आत्तार यांच्या विद्यापीठनिर्मित फुले कासारी वाणाच्या नाचणी पिकाच्या प्रात्यक्षिक प्लॉटवर करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक आणि कृषि







तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. पंडित खर्डे, प्रभारी तालुका कृषि अधिकारी सौ. प्रमीला जंजिरे, जिल्ह्याचे महाबीजचे व्यवस्थापक श्री. सुनील दौंड, शेतकरी संघटक श्री. राहुल पोळ, कोल्हापूर येथील अखिल भारतीय समन्वयित नाचणी व पौष्टिक तृणधान्य संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. योगेश बन, डॉ. सुनील अडांगळे, प्रा. अन्सार आत्तार उपस्थित होते.

यावेळी डॉ. प्रशांत बोडके मार्गदर्शन करतांना म्हणाले की बदलत्या परिस्थितीत पौष्टिक तृणधान्ये हे रोग कीड प्रतिकारक तसेच कमी पाण्यात येणारे आहे. पौष्टिक तृणधान्य आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असल्याकारणाने या पिकांच्या लागवडीस भरपूर वाव आहे. नागलीसारख्या पौष्टिक तृणधान्यामध्ये प्रक्रिया करण्यास भरपूर वाव असून यामुळे शेतकऱ्यांना प्रक्रियाद्वारे अधिक मोबदला मिळू शकतो. संतुलित खत वापर या अभियानांतर्गत त्यांनी जैविक खते तसेच हिरवळीच्या खतांचे महत्त्व विशद केले. येत्या खरीप हंगामात पिकांचे योग्य नियोजन करून हा हंगाम यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक डॉ.पंडित खर्डे यांनी प्रास्ताविकात प्रकल्पाची माहिती देऊन त्याची उद्दिष्टे सांगितली. ते म्हणाले की या प्रकल्पांतर्गत कोल्हापूर, अहिल्यानगर, नाशिक आणि धुळे या जिल्ह्यात पाचशेपेक्षा जास्त पौष्टिक तृणधान्यांची पीक प्रात्यक्षिके या खरीप हंगामात घेण्यात येतील आणि या तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणावर करण्यात येईल. या कार्यक्रमादरम्यान सौ. जंजिरे, श्री.दौंड तसेच शेतकरी संघटक श्री. राहुल पोळ आणि शेतकरी श्री. सलीम आत्तार, श्री. भाऊसाहेब घाटे, श्री. राजेंद्र बिबवे, मेजर परमेश्वर गिलके यांनी नाचणी पीक लागवडीबद्दल आपले अनुभव सांगितले. यावेळी डॉ. योगेश बन यांनी नाचणी व पौष्टिक तृणधान्य पिकांचे महत्त्व व लागवड तंत्रज्ञान याबद्दल शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली.

यावेळी मान्यवरांच्या शुभहस्ते संतुलित खत वापर व्यवस्थापन अभियान २०२६ चे भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ. सुनील अडांगळे यांनी केले तर डॉ. योगेश बन यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांनी आणि शेतकऱ्यांनी फुले कासारी नाचणी वाणाच्या पीक प्रात्यक्षिकांना भेटी देऊन पिकाची पाहणी केली. याप्रसंगी श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण, बनपिंपरी, नवनाथनगर येथील शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषि विद्यापीठ, कृषि विभाग तसेच आयोजक शेतकऱ्यांनी प्रयत्न केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

मफुकृवि ई वार्ता

मे
२०२६



## टाकळीभान येथे खरीप पूर्व नियोजन, ऊस पीक व्यवस्थापन व मार्गदर्शन मेळावा संपन्न
## संतुलित खत वापर जागृकता अभियान –२०२६ अंतर्गत भित्तीपत्रिकेचे विमोचन




**दि. २९ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील आंतरविद्याशाखा जलसिंचन व्यवस्थापन विभाग आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे खरीप पूर्व नियोजन, ऊस पिकासाठी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन व हुमणी अळीचे नियंत्रण या विषयांवर मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आंतरविद्याशाखा जलसिंचन व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. विजयकुमार पाटील, मृदशास्त्रज्ञ डॉ. सुभाष घोडके, कृषि अधिकारी श्रीमती पौर्णिमा गाडे, कृषि सहाय्यक श्री. शेषराव देशमुख व प्रगतशील शेतकरी श्री. जयकर मगर उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. विजयकुमार पाटील यांनी माती परीक्षणाचे महत्व सांगताना माती परीक्षण कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले. जमिनीचा सामू, विद्युत वाहकता, जमिनीतील चुनखडीचे प्रमाण या त्रिसूत्रीच्या आधारे जमिनीच्या आरोग्याचे मूल्यमापन करता येते याबाबत मार्गदर्शन केले. वाढत्या तापमानामुळे जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण कमी होत असल्याबाबत निरीक्षण नोंदवून जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण कसे वाढवता येईल याविषयी माहिती दिली. आदर्श शेणखत कसे तयार करावे, कंपोस्ट खत, हिरवळीच्या खतांचा व जिवाणू खतांचा वापर करून सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढविण्याच्या उपाययोजना सांगितल्या. जमिनीचा पोत सुधारून जमिनीतील सूक्ष्म जीवाणूंची संख्या वाढल्यास पिकांना उपलब्ध अन्नद्रव्य मिळण्यास मदत होऊन उत्पादनात वाढ होईल असा सल्ला त्यांनी यावेळी दिला. शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनीतील मातीचे नमुने विद्यापीठातून तपासून घ्यावेत त्याचप्रमाणे विद्यापीठाकडे उपलब्ध असलेली द्रवरूप सूक्ष्म अन्नद्रव्ये, जिवाणू खते वापरावीत असे आवाहन डॉ. पाटील यांनी यावेळी केले. डॉ. सुभाष घोडके यांनी ऊस पिकासाठी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन आणि हुमणी अळीचे नियंत्रण या विषयावर मार्गदर्शन करताना ऊस पिकाचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने रासायनिक खते वापराचे वेळापत्रक, सूक्ष्म अन्नद्रव्य व्यवस्थापन, कंपोस्ट खते, हिरवळीचे खते, जिवाणू खते इत्यादी खतांचा एकात्मिक वापर करून अपेक्षित उत्पादन कसे घ्यावे याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी यावेळी हुमणी अळीचा बंदोबस्त करण्यासाठी या अळीच्या वाढीच्या अवस्था समजावून सांगितल्या. हुमणी अळीचे एकात्मिक नियंत्रण करण्याविषयी भौतिक नियंत्रण म्हणजेच अळीचे कोश भुंगेरे गोळा करणे त्याचबरोबर मशागतीने नियंत्रण करणे तसेच जैविक नियंत्रण व रासायनिक नियंत्रण याबाबत उपाययोजना सुचविल्या. यावेळी सहाय्यक कृषि अधिकारी श्री. आचपाळे यांनी बियाणे उगवणक्षमता प्रात्यक्षिक सादर केले तर सहाय्यक कृषि अधिकारी श्री. आदिनाथ धुमाळ यांनी सोयाबीन पिकातील रुंदवाफा सरी पद्धतीने पेरणीचे फायदे सांगितले. श्री. अवधूत मेहत्रे यांनी बीजप्रक्रिया कशी करावी याबाबत माहिती दिली. या कार्यक्रमासाठी परिसरातील प्रगतशील शेतकरी श्री. भाऊसाहेब पठारे, श्री. यशवंतराव रणनवरे, श्री. राजेंद्र कोकणे, श्री. शिवाजीराव धुमाळ, श्री. विनोद बोडके यांच्यासह कृषि महाविद्यालय, भानसहिवरे येथील ग्रामीण कृषि कार्यानुभव अंतर्गत कृषिदूत अवधूत घाडगे, प्रसाद धिरडे, गणेश घाडगे आदींनी सहभाग घेतला.

## भुईंज येथे हळद पीक परिसंवाद व संतुलित खत वापर अभियानांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन

**दि. ११ मे, २०२६.** रासायनिक खतांच्या असमतोल वापरामुळे जमीन आरोग्यावर होणारा परिणाम लक्षात घेऊन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे व केंद्र शासनाच्या सूचनेनुसार कृषि विज्ञान केंद्र, बोरगाव, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन व कृषक भारती को–ऑपरेटिव्ह लिमिटेड को यांच्या संयुक्त विद्यमाने भुईंज तालुका वाई येथे पीएम प्रणाम कार्यक्रम अंतर्गत हळद पीक परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या पीक परिसंवादाच्या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी वाईचे उपविभागीय कृषि अधिकारी







श्री. संतोषकुमार बरकडे, कृभकोचे राज्य विपणन व्यवस्थापक श्री. जितेंद्र भामरे, भुईंज येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे अध्यक्ष श्री. मदन शिंदे, प्रकल्प उपसंचालक,आत्मा श्री. राहुल माने, मंडल कृषि अधिकारी, भुईंज, श्री. निखिल रायकर व बोरगाव येथील कृषि विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ प्रा. भूषण यादगिरवार उपस्थित होते.

यावेळी आपल्या अध्यक्ष्य मार्गदर्शनात श्री. संतोष कुमार बरकडे म्हणाले की पिकांच्या अन्नद्रव्यासाठी केवळ रासायनिक खतांवरच अवलंबून न राहता शेणखत, कंपोस्ट, गांडूळ खत, जिवाणू खते व हिरवळीचे खते वापरणे आवश्यक आहे.रासायनिक खतांचा संतुलित वापर करावा तसेच शासकीय योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना केले. यावेळी झालेल्या तांत्रिक मार्गदर्शनात प्रा. भूषण यादगिरवार यांनी हळद बेणे प्रक्रिया, भूसूधारकांचा वापर, बाजारपेठेच्या गरजेनुसार वाणांची निवड, ड्रीपच्या माध्यमातून विद्राव्य खतांचा वापर तसेच कंदकुज व्यवस्थापन याविषयी माहिती दिली. यावेळी श्री. जितेंद्र भामरे मार्गदर्शन करताना म्हणाले की संतुलित खत व्यवस्थापन करण्यासाठी, पिकांच्या अन्नद्रव्यांची गरज भागवण्यासाठी खतांची बाजारातील उपलब्धता, सद्यस्थितीतील किमतीनुसार येणारा खर्च, कृषि विद्यापीठाच्या शिफारशीनुसार खतमात्रा आदी बाबींचा विचार करावा. यावेळी विद्यापीठाने निर्मिती केलेल्या संतुलित खत वापर माहितीपत्रकाचे शेतकऱ्यांना वितरण करण्यात आले व त्या आधारे खत व्यवस्थापन करण्याबाबत शेतकऱ्यांना आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख श्री. निखिल रायकर यांनी करून दिली. आभार प्रदर्शन श्री. निखिल जांभुळकर यांनी केले. यावेळी श्री. योगेश जायकर व कृषि विभागातील अधिकारी तसेच वाई तालुक्यातील हळद उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोरेगाव येथे खरीप आढावा बैठकीत संतुलित खत वापर जागृकता अभियानांतर्गत भित्तीपत्रिकेचे विमोचन

**दि. १८ मे, २०२६.** कोरेगाव तालुक्याची खरीप आढावा बैठक मा. आमदार व कृष्णा खोरे महामंडळाचे उपाध्यक्ष श्री. महेश शिंदे, जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष डॉ. सौ. प्रियाताई शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळी कोरेगावचे तालुका कृषि अधिकारी श्री. ज्ञानदेव जाधव, बोरगाव येथील कृषि विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ प्रा. भूषण यादगिरवार उपस्थित होते. याप्रसंगी रासायनिक खतांच्या असमतोल वापरामुळे जमीन आरोग्यावर होणारा परिणाम लक्षात घेऊन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांच्या संकल्पनेतून रासायनिक खतांचा वापर कमी करून पर्यायी खतांचा शेतकऱ्यांनी अवलंब करण्यासाठी संतुलित खत वापर जागरूकता अभियानातंर्गत शेतकऱ्यांना वितरित करण्यासाठी माहिती पत्रिका तयार करण्यात आली असून या आढावा बैठक प्रसंगी विद्यापीठामार्फत तयार करण्यात आलेल्या संतुलित खत वापर जागरूकता अभियान माहिती पत्रकाचे





वितरण श्री. महेश शिंदे, सौ. प्रियाताई शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री. ज्ञानदेव जाधव यांनी कोरेगाव तालुक्यात बियाणे, खते व इतर निविष्ठा उपलब्धिबाबत माहिती दिली. प्रा. भूषण यादगिरवार यांनी विद्यापीठाने तयार केलेल्या संतुलित खत वापर माहितीपत्रकाच्या आधारे खत व्यवस्थापन व खरीप हंगामातील पिकांचे व्यवस्थापन राहुरी कृषि विद्यापीठाच्या शिफारशीप्रमाणे करण्याचे शेतकऱ्यांना आवाहन केले. यावेळी कोरेगाव तालुक्यातील पदाधिकारी, अधिकारी व प्रगतिशील शेतकरी उपस्थित होते.

## फुले समृद्धी गाव सांजोरी येथे संतुलित खत वापर जागरूकता अभियानांतर्गत प्रशिक्षण संपन्न





**दि. १५ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या धुळे येथील कृषि विज्ञान केंद्र यांच्यावतीने फुले समृद्धी ग्राम सांजोरी, ता. धुळे येथे संतुलित खत वापर जागरूकता अभियान २०२६ अंतर्गत महिलांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण भागातील महिलांमध्ये संतुलित खत वापरणाराबाबत जागरूकता निर्माण करणे, मृदा आरोग्याचे संवर्धन करणे तसेच शास्वत शेती पद्धतीचा प्रसार करणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे होते. यावेळी पशुसंवर्धन व दुग्ध शास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. राहुल देसले, कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. दिनेश नांद्रे, कृषि अभियांत्रिकी व प्रक्रिया विषयाच्या विशेषज्ञ प्रा. अमृता राऊत, डॉ. धनराज चौधरी, श्री. विनोद मसुळे, श्रीमती तेलंगे, श्रीमती कुलकर्णी व श्रीमती चक्रनारायण उपस्थित होते. डॉ. बबनराव इल्हे यावेळी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात म्हणाले की शेतीमध्ये महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. महिलांनी आधुनिक शेती तंत्रज्ञान आत्मसात करून संतुलित खत वापरावर भर दिल्यास उत्पादन वाढीसह पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळेल. यावेळी झालेल्या तांत्रिक चर्चासत्रामध्ये प्रा. अमृता राऊत यांनी महिलांचे शेतीमधील योगदान यावर मार्गदर्शन केले. डॉ. धनराज चौधरी यांनी नैसर्गिक व सेंद्रिय शेतीमध्ये पशुधनाचे योगदान व उपयोग याविषयी सविस्तरपणे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या खतांच्या संतुलित वापरा विषयीच्या भीत्तिपत्रकाचे वितरण करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये परिसरातील अनेक महिला शेतकरी व बचत गटातील सदस्य उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मफुकृवि ई वार्ता
मे २०२६

वर्ष :६, अंक क्रं. : ६५, मे, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे जागतिक मधुमक्षिका दिनानिमित्त प्रशिक्षण संपन्न





**दि. २० मे, २०२६.** जागतिक मधुमक्षिका दिनानिमित्त कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे लुपिन फाउंडेशन तसेच एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने विस्तार कार्यकर्ते व शेतकऱ्यांसाठी आधुनिक मधमाशी पालन या विषयावरील एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे होते. यावेळी कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथील प्रभारी कार्यक्रम समन्वयक श्री. रोहित कडू, प्रशिक्षण समन्वयक व शास्त्रज्ञ डॉ. पंकज पाटील, सौ. अमृता राऊत, श्री. जगदीश काथेपुरी, डॉ. धनराज चौधरी, डॉ. अतिश पाटील, लुपिन फाउंडेशनचे श्री. गौरव पाटील, श्री. रवी देशमुख तसेच एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशनचे श्री. गोकुळ खलाणे उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. बबनराव इल्हे यांनी शेती उत्पादन वाढीसाठी व पर्यावरण संतुलनासाठी मधमाशांचे महत्त्व अधोरेखित केले. श्री. रोहित कडू यांनी भारत सरकारच्या संतुलित खत वापर अभियानाविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. पंकज पाटील यांनी आधुनिक मधमाशीपालन, मित्र किडींचे संवर्धन आणि मध उत्पादन तंत्रज्ञान याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. आतिश पाटील यांनी नैसर्गिक व सेंद्रिय शेतीमध्ये शेतीपूरक निविष्ठांचा वापर याविषयी माहिती दिली. सौ. अमृता राऊत यांनी मधाचे पोषणमूल्य, त्याचे महत्त्व आणि विविध प्रक्रिया उत्पादने याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पंकज पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी यांनी तर आभार श्री. गोकुळ खलाणे यांनी मानले. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी विस्तार कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कुणाल राजळे, जीवन राणे, रमेश शिंदे तसेच मधुसूदन अहिरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## फुले समृद्धी ग्राम सांजोरी येथे उन्हाळ्यात पशु शीतवर्धक पूरक आहाराचे महत्त्व विषयावर गटचर्चा संपन्न



**दि. २१ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कार्यरत कृषि विज्ञान केंद्र, धुळे यांच्या वतीने फुले समृद्धी ग्राम सांजोरी, ता. धुळे येथे उन्हाळी हंगामात पशु शीतवर्धक पूरक आहाराचे महत्त्व या विषयावर गटचर्चा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी

कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथील उद्यान विद्या विषय विशेषज्ञ श्री. रोहित कडू, विषय विशेषज्ञ, मृद विज्ञान, डॉ. सतीश पाटील व विषय विशेषज्ञ, पशुसंवर्धन व दुग्ध शास्त्र, डॉ. धनराज चौधरी उपस्थित होते. यावेळी झालेल्या तांत्रिक चर्चासत्रामध्ये डॉ. धनराज चौधरी यांनी उन्हाळ्याच्या कालावधीत वाढते तापमान, उष्णतेचा ताण आणि त्याचा दुधाळ जनावरांच्या आरोग्य व उत्पादन क्षमतेवर होणारा परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. अतिश पाटील यांनी संतुलित खत वापर जागरूकता अभियानांतर्गत खतांचा संतुलित वापर याविषयी सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन केले. माती परीक्षण अहवालानुसार सेंद्रिय खते, जैविक खते व रासायनिक खते वापरल्यास पीक उत्पादन चांगले येईल, खर्च कमी होईल तसेच जमिनीची गुणवत्ता अबाधित राहील यावर मार्गदर्शन केले. श्री. रोहित कडू यांनी फळबाग लागवड यामध्ये प्रामुख्याने लिंबू, पेरू, आंबा लागवड तंत्रज्ञान याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित पशुपालकांना शेतकरी चाचणी प्रयोगांतर्गत पशुशीतवर्धक पूरक आहाराचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी ग्रामीण कृषि कार्यानुभव कार्यक्रम, शासकीय कृषि महाविद्यालय, धुळे येथील कृषि कन्या तसेच पशुपालक, शेतकरी व युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे संतुलित खत वापर जागरूकता अभियानांतर्गत एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन





**दि. २७ मे, २०२६.** कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे धुळे जिल्ह्यातील घाऊक खत विक्रेते, बियाणे वितरक व कृषि निविष्ठा संबंधित विविध कंपनी प्रतिनिधी यांच्यासाठी संतुलित खत वापर जागरूकता अभियानांतर्गत एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे होते. याप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, धुळे श्री. सुरज जगताप, जिल्हा परिषदेच्या कृषि विकास अधिकारी श्रीमती कावेरी राजपूत, कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, मृदा शास्त्र विषयाचे विषय विशेषज्ञ डॉ. अतिश पाटील, जिल्हा परिषदेचे मोहीम अधिकारी श्री. भास्कर जाधव, जिल्हा डीलर असोसिएशनचे अध्यक्ष श्री. मानसिंग गिरासे, कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. पंकज पाटील, श्री.रोहित कडू, श्री. जगदीश काथेपुरी, श्रीमती अमृता राऊत, डॉ. धनराज चौधरी तसेच कृषि अधिकारी श्री. अरुण तायडे, श्री. सूर्यवंशी उपस्थित होते.

यावेळी डॉ. बबनराव इल्हे यांनी अध्यक्षीय भाषणात रासायनिक खतांना असलेले विविध जैविक आणि सेंद्रिय खतांच्या पर्यायाबद्दल विचार मांडले. रासायनिक खतांचे दुष्परिणाम रोखण्यासाठी जैविक व सेंद्रिय निविष्ठांचा वापर वाढवणे गरजेचे आहे असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठ उत्पादित निविष्ठांचा वापर व विक्री करावी असे आवाहन उपस्थितांना केले. डॉ. अतिश पाटील यांनी खतांचा संतुलित वापर याविषयी सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन केले डॉ. पंकज पाटील यांनी विविध जैविक खते व जैविक कीडनाशके यांच्याविषयी शास्त्रीय माहिती दिली. यावेळी हिरवळीचे खते, जैविक खते, माती परीक्षण, खते देण्याच्या शास्त्रीय पद्धती इत्यादी विषयांवर कृती प्रात्यक्षिके उपस्थितांना दाखविण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या खतांचा संतुलित वापरा विषयीच्या भीत्तिपत्रकाचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिनेश नांद्रे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अतिश पाटील यांनी तर आभार डॉ. पंकज पाटील यांनी मानले. या कार्यक्रमास धुळे जिल्ह्यातील घाऊक खत विक्रेते बियाणे वितरक व कृषि निविष्ठ संबंधित विविध कंपनी प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शाश्वत शेती तंत्रज्ञानावर वडली येथे मार्गदर्शन





**दि. २६ मे, २०२६.** खरीप हंगाम आणि एल निनोमुळे उद्भवू शकणाऱ्या हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर कृषि विभाग, आत्मा, जळगाव व कृषि विज्ञान केंद्र, ममुराबाद, जि. जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने वडली येथे शेतकरी जनजागृती बैठक संपन्न झाली. जळगावचे जिल्हाधिकारी श्री. रोहन घुगे यांच्या सूचनेनुसार व जिल्हाध्यक्ष कृषि अधिकारी श्री. कुरबान तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. याप्रसंगी विषय विशेषज्ञ श्री. किरण जाधव, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक श्री. सोनू पाटील, सरपंच श्री. युवराज गायकवाड व कृषिताई श्रीमती स्वाती पाटील, रुपेश पाटील व मनीषा पाटील उपस्थित होत्या.

याप्रसंगी श्री. कुरबान तडवी मार्गदर्शन करताना म्हणाले की खतांचा संतुलित वापर, नैसर्गिक निविष्ठांची निर्मिती आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक उपाययोजनांबाबत जिल्हाभर गावपातळीवर जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. यावेळी तांत्रिक मार्गदर्शन करताना श्री. किरण जाधव यांनी खतांचा संतुलित वापर, भाजीपाला व फळबाग लागवड यावर मार्गदर्शन केले. श्री. सोनू पाटील यांनी एल निनोच्या पार्श्वभूमीवर आंतरपीक पद्धत आणि बीबीएफ तंत्रज्ञानाचे महत्त्व स्पष्ट केले. कमी पावसात ओलावा टिकून ठेवणे आणि अतिवृष्टीत पाण्याचा निचरा करण्यासाठी बीबीएफ तंत्र प्रभावी ठरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी शेतकरी श्री. विकास पाटील यांच्या प्रक्षेत्रावर दशपर्णी अर्क व जीवामृत तयार करण्याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. या कार्यक्रमासाठी श्री. संजय पाटील, श्री. सचिन पाटील, श्री. श्यामकांत पाटील, श्री. रमेश पाटील, श्री. गजानन पाटील, श्री. वसंत पाटील, श्री. संभाजी पाटील यांच्यासह इतर शेतकरी उपस्थित होते.

## शेंडा पार्क येथे खरीप पूर्व हंगाम पीक चर्चासत्र व प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न




**दि. १३ मे, २०२६.** कोल्हापूर जिल्ह्यातील शेंडा पार्क येथील विभागीय कृषि संशोधन केंद्रात राजर्षी शाहू महाराज शेतकरी शास्त्रज्ञ मंचाच्या वतीने खरीप पूर्व हंगाम पीक चर्चासत्र व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सहयोगी संशोधन

संचालक डॉ. सुनील कराड हे होते. यावेळी त्यांच्या हस्ते संतुलित खत वापर जागरूकता अभियान २०२६ माहिती पत्रिकेचे विमोचन करण्यात आले. सदर माहितीपत्रिका महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आली असून त्यासाठी संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. जालिंदर पांगरे, कृषि उपसंचालक श्री. नामदेव परीट, सहयोगी प्राध्यापक (मृदा शास्त्र) डॉ. प्रवीण गजभिये, डॉ. मयूर सुतार, डॉ. सुहास भिंगारदिवे, डॉ. शैलेंद्र वाळे, डॉ. संभाजीराव जाधव, डॉ. योगेश बन व शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे अध्यक्ष श्री. सर्जेराव पाटील उपस्थित होते. यावेळी डॉ. सुनील कराड यांनी शेतकरी शास्त्रज्ञ मंचाच्या सदस्यांनी विद्यापीठाचे तंत्रज्ञान आपापल्या भागामध्ये पोहोचविण्याचे आणि बदलत्या हवामानात शेतकऱ्यांनी कृषि विद्यापीठाच्या शिफारशींचा वापर करण्याचे आवाहन केले. श्री. जालिंदर पांगरे यांनी कृषि विभागाच्या योजना मंचाच्या माध्यमातून सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. श्री. नामदेव परिट यांनी जागतिक तापमान वाढीवर उपाययोजना सुचविल्या. यावेळी उपस्थित तज्ज्ञांनी शेतकऱ्यांशी विविध विषयांवर संवाद साधला. या कार्यक्रमासाठी श्री. महावीर वळीवडे यांच्यासह जिल्ह्यातील २५ शेतकरी उपस्थित होते.

## कोल्हापूर येथील प्रादेशिक ऊस आणि गूळ संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावर शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे चर्चासत्र संपन्न





**दि. २२ मे, २०२६.** कोल्हापूर येथील प्रादेशिक ऊस आणि गुळ संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावर शेतकरी–शास्त्रज्ञ मंचाचे संतुलित खत जागरूकता अभियान २०२६ या विषयावरील चर्चासत्र संपन्न झाले. ऊस उत्पादकता वाढवणे आणि जमिनीची सुपीकता टिकवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश होता. याप्रसंगी या प्रकल्पाचे शास्त्रज्ञ डॉ. विद्यासागर गेडाम, डॉ. दीपक सावळे व ऊस पैदासकार डॉ. चंद्रकांत कांबळे उपस्थित होते. यावेळी तांत्रिक मार्गदर्शनामध्ये डॉ. विद्यासागर गेडाम यांनी शेतकऱ्यांना उसाच्या नवनवीन जाती व त्यांच्या गुणवैशिष्ट्यांबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. दीपक सावळे यांनी उसाची उत्पादकता आणि जमिनीची गुणवत्ता राखण्याबाबत मोलाचा सल्ला दिला. यावेळी शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी सहाय्यक अधीक्षक श्रीमती सुनिता खोत, श्री. अतुल पांडव, श्री. महेंद्र वळसे, श्री. कृष्णात गुरव, श्रीमती सारिका पाटील यांच्यासह इतर अधिकारी कर्मचारी व मंचाचे सदस्य उपस्थित होते.

## गणेशखिंड, पुणे येथील विभागीय कृषि संशोधन केंद्राला मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांची भेट

**दि. १७ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी विभागीय कृषि संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे येथील विविध संशोधन प्रकल्पांना भेटी दिल्या. यावेळी संशोधन केंद्राचे प्रमुख तथा सहयोगी संशोधन संचालक डॉ. दत्तात्रय लाड उपस्थित होते. यावेळी मा. कुलगुरू महोदयांनी फळबाग संशोधन प्रकल्पातील विदेशी आंबा लागवड प्रयोग व इतर फळझाडांच्या प्रयोगांना भेटी दिल्या व प्रयोगाची सविस्तरपणे माहिती घेतली. संशोधन केंद्रावरील रोपवाटिकेस भेट देऊन रोपवाटिकेतील मातृ वृक्ष, विविध फळझाडांची कलमे, रोपे व शोभिवंत झाडे यांची सविस्तरपणे माहिती घेऊन शुद्ध व दर्जेदार कलमे, रोपे तयार करण्याचे सूचित केले. रोपवाटिकेत नव्याने स्थापन केलेल्या सिताफळ व अंजीर रोपवाटिकेतील विविध मूलभूत सुविधांची पाहणी केली. त्यानंतर विभाग क्र. ३ कडील संशोधन प्रयोग व उत्पादकता चाचणी प्रयोग यांची पाहणी करून संशोधनाबाबत मूलभूत सूचना केल्या. यावेळी त्यांनी माळी प्रशिक्षण केंद्राच्या नव्याने बांधण्यात आलेल्या मुख्य इमारतीची पाहणी करून सदरची इमारत अद्ययावत करण्याबाबत मार्गदर्शन केले. या भेटीदरम्यान विभागीय कृषि संशोधन



केंद्र, गणेशखिंड, पुणे येथील सर्व शास्त्रज्ञांशी मा. कुलगुरूंनी संवाद साधला. या भेटी दरम्यान संशोधन केंद्रावर असलेल्या मूलभूत सुविधा, विकासात्मक व संशोधनात्मक कामे याबाबत संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. दत्तात्रय लाड यांनी माहिती दिली.

## रायतळे येथे कृषि निविष्ठांचे वाटप



**दि. २० मे, २०२६.** मौजे रायतळे येथे कृषि विभाग, पारनेर आणि पुष्प संशोधनालय, अखिल भारतीय समन्वित पुष्प संशोधन प्रकल्प तसेच विभागीय कृषि संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शक म्हणून डॉ. दत्तात्रय लाड उपस्थित होते. याप्रसंगी तालुका कृषि अधिकारी श्री. गजानन घुले, पुष्पविशेषज्ञ डॉ. एस.बी. जाधव, कनिष्ठ वनस्पती रोग शास्त्रज्ञ डॉ. सुनील लोहाटे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषि अधिकारी, उप कृषि अधिकारी, तंत्रज्ञान व्यवस्थापक आणि सहाय्य कृषि अधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## अभिनंदन

### विभागीय कृषि संशोधन केंद्र, गणेशखिंड येथील रोपवाटीकेस दोन तारांकन दर्जा प्राप्त

**दि. ९ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत गणेशखिंड, पुणे येथे असलेल्या विभागीय कृषि संशोधन केंद्राच्या रोपवाटीकेस भारत सरकारच्या राष्ट्रीय बागवानी बोर्डामार्फत दोन तारांकन दर्जा देऊन प्रमाणित करण्यात आले आहे. सदरच्या दोन तारांकन दर्जाची मान्यता ही २०२६-२७ व २०२७-२८ या दोन वर्षासाठी असणार आहे. गणेशखिंड संशोधन केंद्राच्या रोपवाटीकेस राष्ट्रीय बागवानी बोर्डाच्या समितीने प्रत्यक्ष भेट देऊन रोपवाटिकेत असलेल्या विविध फळझाडांचे मातृवृक्ष प्लॉट, शेडनेट हाउस, पॉलिहाउस, पाणी देण्याच्या सुविधा,



कलमे व रोपांची प्रत्यक्ष पाहणी करून दोन तारांकन दर्जाची मान्यता दिलेली आहे. रोपवाटिकेत असलेले मातृवृक्ष, मुलभूत सुविधा व कलमे रोपे यांची प्रत्यक्ष पाहणी करून राष्ट्रीय बागवानी बोर्डाच्या प्रमाणित करणाऱ्या समितीने समाधान व्यक्त केले.

गणेशखिंड येथील रोपवाटिकेत फळझाडांमध्ये आंबा, पेरू, सीताफळ, डाळिंब, लिंबू व चिकू इ.फळझाडांची कलमे मोठ्या प्रमाणावर तयार करून शेतकऱ्यांना नियमितपणे पुरवठा केला जात आहे. सध्या चालू हंगामामध्ये वरील फळझाडांची कलमे मोठ्या प्रमाणात विक्रीस उपलब्ध आहेत. रोपवाटीकेस दोन तारांकन दर्जाचे मानांकन मिळाल्यामुळे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता (कृषि) डॉ. साताप्पा खरबडे व उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. भरत पाटील यांनी विभागीय संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. सुभाष भालेकर, रोपवाटिका प्रमुख व आदर्श रोपवाटिका प्रकल्पाचे मुख्य समन्वयक डॉ. बी. व्ही. गोंधळी व रोपवाटीकेतील इतर अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठातील बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेस राष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्कृष्ट संशोधन केंद्राचा पुरस्कार



**दि. १५ मे, २०२६.** जम्मू येथील शेर–ए–काश्मीर कृषि विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठात झालेल्या अखिल भारतीय बियाणे विज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थेच्या ४१ व्या वार्षिक बैठकीमध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठातील बियाणे विभागातील बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेस सन २०२५–२६ या वर्षातील राष्ट्रीय पातळीवरील सर्वोत्कृष्ट संशोधन केंद्र म्हणून गौरविण्यात आले. सदरचा पुरस्कार नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे उपमहासंचालक (पीक शास्त्र) डॉ. डि.के. यादव आणि जम्मू येथील शेर–ए–काश्मीर कृषि विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. बी.एन. त्रिपाठी यांच्या शुभहस्ते व नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे सहाय्यक महासंचालक (बियाणे) डॉ. पी.आर. चौधरी, उत्तर प्रदेशातील मऊ येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या राष्ट्रीय बियाणे विज्ञान व तंत्रज्ञान संस्थेचे

प्रकल्प संचालक डॉ. ए. आनंदन यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. सदरचा पुरस्कार प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. नरेंद्र काशीद, बियाणे संशोधन अधिकारी डॉ. सुरेश झांजरे, डॉ. कैलास भोईटे, डॉ. अनिल सूर्यवंशी, डॉ. अविनाश कर्जुले, डॉ. रश्मी भोगे, डॉ. कैलास गागरे आणि डॉ. दीपक गायकवाड यांनी स्वीकारला.

या वार्षिक आढावा बैठकीत बियाणे रोगशास्त्र विषयातील दोन, बियाणे प्रक्रिया या विषयातील एक, बीजोत्पादन व प्रमाणिकरण या विषयातील एक, बियाणे कीटकशास्त्र या विषयातील एक अशा एकूण पाच शिफारशी राष्ट्रीय स्तरावर प्रसारित करण्यात आल्या आहेत. या आधी या बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेने राष्ट्रीय स्तरावर ६८ तर राज्य स्तरावर २७ तंत्रज्ञान शिफारशी शेतकऱ्यांसाठी प्रसारीत केल्या आहेत. या योजनेस तीन वेळा राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट संशोधन केंद्र म्हणून गौरविण्यात आले आहे. बीजोत्पादनातील विविध अडचणी समोर ठेवून त्यासंदर्भातील नियोजन व संशोधन कार्यात महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे आणि संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके तसेच सहयोगी संशोधन संचालक डॉ. विजय शेलार यांचे बहुमोल मार्गदर्शन व बियाणे तंत्रज्ञान संशोधन योजनेच्या शास्त्रज्ञांनी या संदर्भात केलेल्या संशोधनकार्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांनी या योजनेतील शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले आहे. या योजनेला पुरस्कार मिळाल्याबद्दल या योजनेतील सर्व शास्त्रज्ञांचे विद्यापीठाच्या सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाने तयार केलेल्या कृषि यंत्रास मिळाले पेटंट



**दि. २२ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली अंतर्गत अखिल भारतीय समन्वित कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प कार्यरत आहे. या प्रकल्पामध्ये संशोधित केलेल्या ट्रॅक्टरचलीत स्पेड नांगर तव्याच्या कुळवासहित या यंत्रास भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाने पेटंट प्रदान केले आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली या यंत्राच्या संशोधनात महत्वाचे योगदान देणारे अखिल भारतीय समन्वित कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ. तुलसीदास बास्टेवाड तसेच त्यांचे सहकारी डॉ. संजय भांगरे, डॉ. रवीकिरण राठोड, इंजि. रोहित गेठे यांचा सहभाग आहे.

सदर यंत्र ५५ अश्वशक्ति आणि त्यापेक्षा जास्त अश्वशक्ती ट्रॅक्टरने सहज चालते. स्पेड नांगर तव्याच्या कुळवासहित एकत्रित मशागतीने पेरणी योग्य जमीन तयार करण्यासाठी उपयुक्त आहे. या यंत्राच्या वापरामुळे मशागतीसाठी लागणाऱ्या खर्चात आणि वेळेत बचत होते. एका तासामध्ये ०.३३ हेक्टर क्षेत्रावर मशागत करता येते. या यंत्राच्या वापरामुळे पारंपारिक पद्धतीपेक्षा खर्चामध्ये ४४% पर्यंत बचत होते. एकत्रित मशागत करण्यासाठी विकसीत करण्यात आलेल्या या ट्रॅक्टरचलीत फुले स्पेड नांगर तव्याच्या कुळवासहित या यंत्रास राज्यस्तरीय संयुक्त कृषि संशोधन व विकास समिती बैठक–२०२५ मध्ये प्रसारीत करुन शिफारशीत करण्यात आलेले आहे. मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे उपमहासंचालक (कृषि अभियांत्रिकी) डॉ. एस.एन. झा, सहाय्यक महासंचालक डॉ. के.पी. सिंग, भोपाळ येथील केंद्रिय कृषि अभियांत्रिकी संस्थेचे संचालक डॉ. सी.आर. मेहता, अखिल भारतीय समन्वीत कृषि अवजारे व यंत्रे संशोधन प्रकल्प संचालक डॉ. पी.एन. अग्रवाल व डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे यांनी या पेटंटमध्ये सहभागी शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले आहे. कृषि विद्यापीठाच्या सर्व स्तरातुन संबंधीत शास्त्रज्ञांचे अभिनंदन होत आहे.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा खुरासणी संशोधन प्रकल्प उत्कृष्ट संशोधन केंद्र पुरस्काराने सन्मानित

**दि. २६ मे, २०२६.** भारतीय तेलबीया संशोधन संस्था, हैद्राबाद येथे ऑनलाईन पध्दतीने तेलबीया वार्षिक आढावा बैठक पार पडली. या बैठकीत महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या इगतपूरी येथील विभागीय कृषि संशोधन केंद्र येथे कार्यरत असलेल्या अखिल भारतीय समन्वीत खुरासणी (कारळा) संशोधन प्रकल्पास उत्कृष्ट संशोधन केंद्र पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. यावेळी नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे उपमहासंचालक (पीक विज्ञान) डॉ. डी.के. यादव, प्रभारी अतिरिक्त महासंचालक (तेलबीया आणि कडधान्य पिके) डॉ. एस.के. झा, हैद्राबाद येथील भारतीय तेलबीया संशोधन संस्थेचे संचालक डॉ. आर.के. माथूर व प्रकल्प संचालक डॉ. आनंद विश्वकर्मा उपस्थित होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके व सहयोगी संशोधन संचालक डॉ. हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकल्पाने शेतकऱ्यांसाठी भरीव योगदान दिले आहे. या केंद्राने आत्तापर्यंत सह्याद्री, फुले कारळा, फुले वैतरणा आणि फुले कळसुबाई हे वाण आणि नऊ तंत्रज्ञान शिफारशी शेतकऱ्यांसाठी प्रसारीत केल्या आहेत. या प्रकल्पाने दिलेल्या या योगदानाची दखल घेवून सदरचा पुरस्कार मिळाल्याची माहिती प्रकल्पाचे खुरासणी पैदासकार तथा प्रभारी अधिकारी डॉ. दिपक डामसे यांनी दिली. या प्रकल्पातील प्रवीण लोहकरे तसेच विभागीय कृषि संशोधन केंद्रातील डॉ. अविनाश कोलगे, डॉ. जयपाल चौरे, प्रा. सुरेश परदेशी, प्रा. रंगनाथ बागुल, मिलिंद पाटील, गणेश बहिरम, गजेंद्र फुलपगारे व अमीत वाघ या सर्वांचे सहकार्य मिळाले.

## कृषि महाविद्यालयांचे विविध उपक्रम

### कृषि विद्यापीठात पुणे विभागीय नैसर्गिक शेती कार्यशाळेचे आयोजन




**दि. ८ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, कृषि विभाग, महाराष्ट्र शासन व आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे विभागीय नैसर्गिक शेती कार्यशाळेचे आयोजन महात्मा फुले कृषि विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय सभागृहात करण्यात आले. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे होते. याप्रसंगी आत्माचे संचालक श्री. सुनील बोरकर, कृषि संचालक श्री. विनयकुमार आवटे, पुणे विभागाचे विभागीय कृषि सहसंचालक श्री. दत्तात्रय गवसाने, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता (कृषि) डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, प्रकल्प संचालक, आत्मा, अहिल्यानगर श्री. प्रदीप लाटे, प्रकल्प संचालक, आत्मा, पुणे श्री. सुरज मडके, प्रकल्प संचालक, आत्मा, सोलापूर डॉ. कांताप्पा खोत, कृषिविद्या विभागाचे प्राध्यापक व सेंद्रिय शेती प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. उल्हास सुर्वे, रोमिफ इंडियाचे संस्थापक डॉ. प्रशांत नाईकवाडी, कृषि विज्ञान केंद्र, दहिगावणेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. शामसुंदर कौशिक, श्री. सागर गायकवाड, श्री. राजाराम गायकवाड व श्रीरामपूरचे उपविभागीय कृषि अधिकारी श्री. प्रवीण गोसावी उपस्थित होते.

यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे म्हणाले की रासायनिक खतांच्या अमर्याद वापरामुळे बिघडलेले जमिनीचे आरोग्य, हवामानातील बदल, पाण्याची प्रत याचा परिणाम पिकांच्या उत्पादकतेवर होत आहे. जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी तसेच शेती शाश्वत करण्यासाठी पुणे येथे मा. राज्यपालांच्या पुढाकारातून महाराष्ट्रात प्रथमच नैसर्गिक शेतीवर भव्य कार्यशाळा आयोजित

करण्यात आली. नैसर्गिक शेतीसाठी निविष्ठांच्या निर्मितीचा अडसर येऊ नये म्हणून शेतावरच निविष्ठा तयार करावयाच्या आहेत. यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने तयार केलेले एकात्मिक शेती पद्धतीचे मॉडेल फलदायी ठरेल. शेण, गोमूत्र, पिकांचे अवशेष हे सर्व शाश्वत शेतीसाठी महत्त्वाचे असून त्यासाठी नैसर्गिक शेतीला समजून घेतले पाहिजे. या कार्यशाळेमध्ये सहभागी झालेल्या शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीचे तंत्रज्ञान या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करणाऱ्या तज्ञांकडून प्रथम समजून घ्या, आपल्या मनामध्ये कोणताही संभ्रम ठेवू नका. श्री. सुनील बोरकर नैसर्गिक शेती बहुआयामी दृष्टिकोन या विषयावर बोलताना म्हणाले की या कार्यशाळेत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांवर एक विशेष जबाबदारी आहे, ती म्हणजे या कार्यशाळेतून त्यांनी प्रेरणा घेऊन आपल्या भागात नैसर्गिक क्रांती घडवायची आहे. तुम्ही तुमच्या शेतीमध्ये केलेला प्रयोग इतर लोकांना सांगायचा आहे. मला जे मिळाले आहे ते मी इतरांना देईल या विचाराने प्रेरित होऊन येथून जायचे आहे. प्रत्येकाने ३० ते ४० शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती संबंधित ज्ञान द्यायचे आहे. तांत्रिक सत्रामध्ये अहमदाबाद येथील गीर गो शाळेचे संस्थापक श्री. गोपाळभाई सुतारीया, डॉ. प्रशांत नाईकवाडी, डॉ. उल्हास सुर्वे व श्री. दत्तात्रय शेरकर यांनी नैसर्गिक शेतीशी संबंधीत विविध विषयांवर उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी नैसर्गिक शेतीमध्ये वापरण्यात येणाऱ्या विविध निविष्ठांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. दत्तात्रय गवसाने यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. उल्हास राक्षे यांनी तर आभार श्री. प्रदीप लाटे यांनी मानले. या कार्यशाळेसाठी अहिल्यानगर, पुणे व सोलापूर या विभागातील कृषि विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच नैसर्गिक शेती करणारे १५०० शेतकरी उपस्थित होते.

## कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न



**दि. २२ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सन २०२५–२६ या वर्षाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन पुणे येथील बोल्डनेट इंडिया करिअर सर्व्हीसेस या संस्थेचे संचालक इंजि. अविनाश देशमुख उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, काष्टी येथील छत्रपती शिवाजी महाराज संकुलाचे प्रमुख डॉ. महानंद माने व विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. कैलास कांबळे उपस्थित होते.

याप्रसंगी मा. कुलगुरु डॉ. विलास खर्चे म्हणाले की शेती शाश्वत करण्यासाठी विद्यापीठाचे तंत्रज्ञान प्रभावी ठरणार असून यामध्ये कृषि अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना मोठी संधी आहे. विद्यार्थ्यांमध्ये खुप मोठी क्षमता आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी त्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करुन देणे गरजेचे होते. यासाठी विद्यापीठामध्ये स्पर्धात्मक परिक्षा, कृषि उद्योजकता व शेतीमधील उच्च तंत्रज्ञान या तीन फोरमची स्थापना करण्यात आली असून हे फोरम विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल करण्यासाठी उपयुक्त ठरतील. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. हा त्यांच्या आयुष्यामधील अभिमानाचा क्षण म्हणावा लागेल. विद्यापीठाने शेती संशोधनामध्ये फार मोठे तंत्रज्ञान विकसीत केले आहे. शेतकरी हे तंत्रज्ञान प्रत्यक्ष शेतात वापरत आहेत. या तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करण्यासाठी विद्यार्थ्यांना मोठी संधी आहे कारण दुसरी हरितक्रांती ही कृषि अभियांत्रिकीचे विद्यार्थीच करतील असे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले. यावेळी इंजि. अविनाश देशमुख विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाले की फक्त स्पर्धा परिक्षांवर अवलंबून न राहता आपली क्षमता ओळखुन काम करा. कृषि क्षेत्रातील शिक्षण न घेतलेले कृषि उद्योजक होत आहेत. तुम्ही तर या शेती क्षेत्रात शिक्षण घेत आहात. तुम्ही फक्त स्वतःवर विश्वास ठेवा, स्वतःला शोधा. तुमच्यातील कोणत्याही एका क्षमतेला विकसीत करण्यासाठी पाच वर्षांचा वेळ द्या. हे जग म्हणजे मोठे

मार्केट असून यामध्ये खुप साऱ्या संधी आहेत. फक्त स्वतःला ओळखुन स्वतःकरीता योग्य क्षेत्र निवडण्याची गरज असल्याचे यावेळी ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सचिन नलावडे यांनी केले. डॉ. अवधुत वाळुंज यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करुन दिली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार डॉ. कैलास कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदित्य उगले, संस्कृती सरोदे, साई मंडलीक व मधुरा लांडगे यांनी केले. या कार्यक्रमासाठी कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयातील विविध विभाग प्रमुख, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हाळगाव येथील शासकीय कृषि महाविद्यालयात ६७ वा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा




**दि. १ मे, २०२६.** हाळगाव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालयात ६७ वा महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. पोपट पवार, शारीरिक शिक्षण निदेशक डॉ. प्रशांत सावंत, डॉ. निलेश लांडे, डॉ. अंबादास मेहत्रे, डॉ. किरण चौधरी व डॉ. प्रणाली ठाकरे उपस्थित होते.

यावेळी डॉ. दत्तात्रय सोनवणे मार्गदर्शन करताना म्हणाले की महाराष्ट्र हे शेती, औद्योगिक उत्पादने, व्यापार आणि दळणवळण क्षेत्राच्या बाबतीत देशातील आघाडीचे राज्य आहे. देशातील एक अग्रेसर औद्योगिक राज्य असलेल्या महाराष्ट्राचे देशाच्या एकूण उत्पादनामध्ये १३.५% पेक्षा अधिक योगदान आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता व आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून शेतीला अधिक उत्पादन व शाश्वत करण्यासाठी महाराष्ट्र कृषि कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५–२९ राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान, परंपरागत कृषि विकास योजना आणि डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती अभियान यांची प्रभावी अंमलबजावणी करीत आहे. महाराष्ट्र राज्य जागतिक पातळीवर चहूबाजूंनी अग्रस्थानी नेण्यासाठी प्रयत्न करून एक नवीन व बलशाली असा महाराष्ट्र घडविण्यासाठी प्रत्येकाने एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी श्री. महादू शिंदे व इतर शिक्षकेतर कर्मचारी श्री.संभाजी ढवळ, श्री. सुरेश माकरे, श्री. रामदास गुहाडे, श्री. प्रदीप धाडेकर, श्री. किरण अडसूळ, श्री. संजय सोनवणे, श्री. अनिकेत कुंभार, श्री. अनिता पुराने व विद्यार्थी, कामगार व सुरक्षारक्षक उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय हाळगाव येथे करियर मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

**दि. १३ मे, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव ता. जामखेड येथे प्लेसमेंट विभागाद्वारे विद्यार्थ्यांसाठी कृषि क्षेत्रातील संधी आणि बदलत्या काळातील करिअरच्या वाटा या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे, विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. प्रेरणा भोसले, मुख्य समुपदेशक डॉ. गोकुळ वामन, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार,





प्लेसमेंट अधिकारी डॉ. मनोज गुड, श्री. निशांत इंगोले, अक्षदा अन्नदाते व श्री.दीपक विधाते उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. दत्तात्रय सोनवणे म्हणाले की कृषि पदवीचे शिक्षण हे केवळ शेतीशी संबंधित नसून ते विज्ञानाची एक प्रगत शाखा आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक वृत्ती निर्माण करते. कृषि पदवीधारकांना बँकिंग, खत उद्योग, बियाणे कंपन्या आणि सरकारी धोरण निर्मितीमध्ये मोठे स्थान आहे. विद्यार्थ्यांनी केवळ नोकरी शोधणारे न बनता नोकरी देणारे उद्योजक बनावे असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत मंडळ कृषि अधिकारी व सहाय्यक वनसंरक्षकपदी निवड झालेल्या दीपक विधाते यांनी स्पर्धा परीक्षांच्या तयारीबद्दल सविस्तर माहिती दिली. भारतीय व्यवस्थापन संस्था, सिरमौर येथून पदुत्तर शिक्षण प्राप्त केलेले माजी विद्यार्थी निशांत इंगोले यांनी कृषि आणि व्यवस्थापन क्षेत्र याची सांगड कशी घालावी यावर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी हावर्ड बिजनेस स्कूल मधील अनुभव आणि कृषि क्षेत्रातील संधीविषयी माहिती दिली. तसेच जागतिक बाजारपेठेतील कृषि उत्पादनांच्या मार्केटिंग संधी समजावून सांगितल्या. एचआर प्रोफेशनल आणि आकाशवाणी निवेदिका माजी विद्यार्थीनी अक्षदा अन्नदाते यांनी अष्टपैलू व्यक्तिमत्व विकासाचे महत्त्व यावर भर दिला. संवाद कौशल्य आणि इतर कला जोपासण्याचे आवाहन त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले. संवाद शैली सुधारल्यास ग्रामीण भागातील समस्या प्रभावीपणे मांडू शकतो असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मनोज गुड यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रवीण भवर यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. ऋतुजा मोरे यांनी तर आभार कु. मृणालिनी सरोदे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय हाळगाव येथे छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी



**दि. १४ मे, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत छत्रपती संभाजी महाराज यांची ३६९ वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी स्वयंसेवक कु. प्राची शिंदे व कु. अक्षदा कानडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या मनोगतातून त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाची आणि मुघलांवरील त्यांच्या विजयाची

सविस्तर माहिती सांगितली. यावेळी त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांनी संस्कृत भाषेत लिहिलेल्या बुद्धभूषण या राजनीति, युद्धशास्त्र आणि काव्यावरील उत्कृष्ट ग्रंथाबद्दल माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. प्रीती कवळे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय हाळगाव येथे दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस साजरा



**दि. २१ मे,२०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस साजरा करण्यात आला. भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय श्री. राजीव गांधी यांच्या स्मृती प्रित्यर्थ हा दिवस साजरा केला जातो. भारत सरकारने समाजात दहशतवाद आणि हिंसाचार विषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी २१ मे हा दिवस दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन म्हणून घोषित केला. या दिवसाचा उद्देश समाजामध्ये शांतता, बंधुता, सहिष्णुता आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणे हा आहे. याप्रसंगी महाविद्यालयात दहशतवाद आणि हिंसाचार विरोधात एकजुटीने उभे राहून शांततामय, सुरक्षित आणि सुसंस्कृत भारत घडविण्यासाठी दहशतवाद व हिंसाचार विरोधी शपथ घेण्यात आली. या कार्यक्रमासाठी सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विवेकानंद कुलकर्णी, महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## हाळगाव कृषि महाविद्यालयात शेतकरी शास्त्रज्ञ मंच खरीप आढावा बैठक संतुलित खत वापर जागरूकता अभियान संपन्न





**दि. २२ मे, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय हाळगाव येथे शेतकरी शास्त्रज्ञ मंच खरीप आढावा बैठक, संतुलित खत वापर जागरूकता अभियान २०२६ आणि आपत्कालीन परिस्थितीत पीक नियोजन यावर शेतकऱ्यांना मार्गदर्शनपर कार्यक्रम

कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे होते. याप्रसंगी डॉ. प्रेरणा भोसले, डॉ. संदीप मोरे, डॉ. अंबादास मेहत्रे व जामखेडचे मंडल कृषि अधिकारी श्री. एस. बी. गांगर्डे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. दत्तात्रय सोनवणे म्हणाले की कृषि क्षेत्र खूप व्यापक आहे. सद्यस्थितीत शेतकरी बांधव उत्पादनवाढीसाठी रासायनिक खतांचा बेसुमार वापर करीत आहेत. त्यामुळे जमिनीचे आरोग्य धोक्यात आले आहे. खतांचा संतुलित वापर करणे ही काळाची गरज असून शाश्वत शेती उत्पादनासाठी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. यावेळी झालेल्या तांत्रिक मार्गदर्शनामध्ये डॉ. प्रेरणा भोसले यांनी एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, डॉ. संदीप मोरे यांनी खरीप कांदा लागवड तंत्रज्ञान, डॉ. अंबादास मेहत्रे यांनी खरीप पीक नियोजन या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. श्री. एस. बी. गांगर्डे यांनी शेतकऱ्यांसाठी शासनाच्या विविध योजनांविषयी माहिती दिली. यामध्ये महाविस्तार ॲप, महाडीबीटी प, यांत्रिकीकरण, एकात्मिक फलोत्पादन, कांदा चाळ अनुदान, ठिबक, तुषार सिंचनासाठी अनुदान, कृषि प्रक्रियेसाठी अनुदान तसेच शेतकरी पीक स्पर्धा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी श्री. जालिंदर राऊत, डॉ. दीपक वाळुंजकर आणि श्री. शरद ढवळे या शेतकऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे समन्वयक डॉ. गोकुळ वामन यांनी केले. यावेळी त्यांनी शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची संकल्पना, कार्यपद्धती आणि पुढील दिशा यावर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रणाली ठाकरे व डॉ. निकिता धाडगे यांनी केले तर आभार डॉ. गोकुळ वामन यांनी मानले. या कार्यक्रमासाठी हळगाव पंचक्रोशीतील शेतकरी आणि या महाविद्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी व मॉड्युल विषयाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी

**दि. २८ मे, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत स्वातंत्र्यवीर सावरकर यांची १४३ वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविका कु. ज्ञानेश्वरी होले, कु. सप्तमी जाधव, कु. वैष्णवी कदम व चि. अभिमन्यू धस यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील महान क्रांतिकारक, विचारवंत, साहित्यिक आणि समाज सुधारक स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या अभिनव भारत भारतातील पहिल्या गुप्त सशस्त्र क्रांतिकारी संघटनेची स्थापना, मराठी हिंदी साहित्याचा प्रचार, अस्पृश्यता निर्मूलन, आंतरजातीय विवाह, पतितपावन मंदिराची स्थापना आणि सर्वांसाठी समान शिक्षण यासारख्या सामाजिक सुधारणा व विधायक कार्याची माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. प्राची शिंदे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी





**दि. ३१ मे, २०२६.** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला सहयोगी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय सोनवणे यांच्या हस्ते राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अपर्ण करून अभिवादन करण्यात आले. स्वयंसेवक कु. ज्ञानेश्वरी होले व चि. अभिमन्यु ढुस यांनी न्यायप्रिय, धर्मनिरपेक्ष, प्रजाहितदक्ष पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या देशभरातील प्रसिद्ध १२ ज्योतिर्लिंगांपैकी अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार, महेश्वर येथे हातमाग उद्योगाला प्रोत्साहन, रस्ते बांधकाम, वृक्षारोपण, महिलांना न्याय, विधवांना त्यांचे हक्क, सैन्यात महिलांची स्वतंत्र लष्करी तुकडी, शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्ज आणि दुष्काळातही प्रजेला सर्व प्रकारच्या करांतून सवलत अशा प्रेरणादायी कामांची ओळख करून दिली. तत्कालीन रूढी–परंपरांना छेद देत त्यांनी पतीच्या निधनानंतर सती जाण्याचे नाकारले आणि

स्वतःच्या खांद्यावर राज्याची धुरा सांभाळली. प्रजाहितदक्ष प्रशासन, मंदिर–घाट निर्माण, शेती–व्यापार विकास आणि महिला सक्षमीकरणाचे अद्वितीय कार्य करून 'लोकमाता' म्हणून संपूर्ण भारतात आदर्श निर्माण केला असेही त्यांनी मनोगतातून स्पष्ट केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. श्रावणी रोडे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि तंत्र विद्यालय, मांजरी फार्म, पुणे येथे कॅम्पस मुलाखतींचे आयोजन

**दि. ७ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या या विद्यालयाच्या भेटीदरम्यान केलेल्या सूचनेनुसार कृषि तंत्र विद्यालय, मांजरी फार्म, पुणे येथे विविध खाजगी कंपनी यांच्या विविध पदांवरील भरतीसाठी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. शेतकऱ्यांच्या मुलांना विशेषता कृषि पदविकाधारक विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य श्री. अमित पवार व इतर शिक्षकांनी मिळून सदर कॅम्पस मुलाखतीचे आयोजन केले होते. या कॅम्पस मुलाखतीमध्ये एकूण तीन कंपन्यांनी सहभाग घेतला. यावेळी पुणे जिल्ह्यातील घटक शाळा व विनाअनुदानित शाळांमधून एकूण २२ विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या. यामधून सात विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे मा. कुलगुरू डॉ. विलास खर्चे, अधिष्ठता डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे व कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजू अमोलिक यांनी अभिनंदन केले आहे.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर, जळगाव येथे ६६ वा महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन उत्साहात साजरा





**दि. १ मे, २०२६.** शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर, जळगाव येथे ६६ वा महाराष्ट्र दिन तसेच आंतरराष्ट्रीय कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. संदीप पाटील यांनी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा इतिहास सांगितला. त्यांनी सांगितले की, १९५६ च्या राज्य पुनर्रचना कायद्यानुसार भारतातील राज्यांच्या सीमा भाषेच्या आधारावर निश्चित करण्यात आल्या. संयुक्त महाराष्ट्र चळवळीदरम्यान झालेल्या पोलिस गोळीबारात १०६ आंदोलकांना हौतात्म्य पत्करावे लागले. या हुतात्म्यांच्या बलिदानानंतर १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे महत्त्व विशद करताना डॉ. पाटील यांनी सांगितले की हा दिवस जगभरातील कामगारांच्या हक्कांसाठी झालेल्या चळवळींच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. भारतात प्रथमच १९२३ मध्ये चेन्नई येथे कामगार दिन साजरा करण्यात आला होता अशी माहितीही त्यांनी दिली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे डॉ. गणेश देशमुख, डॉ. रियाज शेख, डॉ. सागर बंड, श्री. सागर पाटील, डॉ. आबासाहेब पराडे यांच्यासह सर्व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर, जळगाव येथे स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती साजरी

**दि. २८ मे, २०२६.** शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर, जळगाव येथे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
मफुकृवि ई वार्ता
मे २०२६

वर्ष :६, अंक क्रं. : ६५, मे, २०२६ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी



मान्यवरांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. यावेळी मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. कुशल ढाके यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. ते म्हणाले की, सावरकर हे भारतीय स्वातंत्र्यसैनिक, राजकारणी, समाजसुधारक, मराठी कवी आणि साहित्यिक होते. तसेच ते हिंदुत्वाचे तत्त्वज्ञ, भाषाशुद्धी व लिपिशुद्धी चळवळीचे प्रणेते म्हणूनही ओळखले जातात. अस्पृश्यतेसारख्या सामाजिक अनिष्ट प्रथांना त्यांनी ठाम विरोध केला आणि समाजात समता व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. त्यांचे राष्ट्रप्रेम, विचार आणि कार्य आजही समाजाला प्रेरणा देणारे असून भावी पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरत राहील. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे डॉ. रवींद्र जाधव, डॉ. आबासाहेब पराडे, श्री. भूषण जगताप, डॉ. ऐश्वर्या पाटील तसेच डॉ. प्रीती दातीर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. भूषण जगताप यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. ऐश्वर्या पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच राष्ट्रीय सेवा योजना सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके आणि डॉ. ऐश्वर्या पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर, जळगाव येथे जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा






**दि. ३१ मे, २०२६.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कार्यरत शासकीय कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर, जळगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.) एककाच्या वतीने जागतिक तंबाखू विरोधी दिन महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना एककाचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. कुशल ढाके यांनी केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी मनोगत व्यक्त करताना तंबाखू सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम, तसेच धूम्रपानामुळे इतरांच्या आरोग्यावर होणारे विपरीत परिणाम याविषयी जागरूकता निर्माण करणारे विचार मांडले. यानंतर उपस्थितांनी तंबाखूमुक्त जीवन जगण्याची व समाजात जनजागृती करण्याची शपथ घेतली. अध्यक्षीय भाषणात डॉ. संदीप पाटील यांनी यावर्षीच्या जागतिक तंबाखू विरोधी दिनाची संकल्पना आकर्षणाचा बुरखा फाडणे–निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनाचा सामना करणे अशी असल्याचे सांगितले. भारतात सुमारे २६.७ कोटी प्रौढ व्यक्ती कोणत्या ना कोणत्या स्वरूपात तंबाखूचे सेवन करतात, ही चिंताजनक बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. तंबाखूच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक दुष्परिणाम याबाबत समाजात व्यापक जनजागृती निर्माण करणे हा या दिनाचा मुख्य उद्देश असल्याचे

त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे डॉ. रियाज शेख, डॉ. कुशल ढाके, डॉ. सागर बंड, डॉ. आबासाहेब पराडे, डॉ. ऐश्वर्या पाटील, श्री. भूषण जगताप तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी यश पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन जतीन पाटील यांनी केले.

## कृषि महाविद्यालय, नंदुरबार येथे शास्त्रोक्त मधमाशी पालन प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न





**दि. २० मे, २०२६.** शासकीय कृषि महाविद्यालय, नंदुरबार येथे जागतिक मधमाशी दिनानिमित्त एक दिवसीय शास्त्रोक्त मधमाशीपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. यू.बी. होले उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. पी. एन. जोगदंडे, डॉ. एस. एस. वाघ, डॉ. के. व्ही. देशमुख, डॉ. डी. बी. सुर्यवंशी व श्री. प्रसाद गांगुर्डे उपस्थित होते. यावेळी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. यु.बी. होले मानवी जीवनातील मधमाशांचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन करताना म्हणाले की मध, मेन,रॉयल जेली यासारख्या उत्पादनाचे आर्थिक व औषधी महत्त्व खूप मोठे आहे. मधमाशी पालन हा ग्रामीण भागातील रोजगार निर्मितीसाठी उपयुक्त व कमी खर्चातील व्यवसाय आहे. शेती उत्पादन वाढ, पर्यावरण संतुलन आणि शेतकऱ्यांच्या अतिरिक्त उत्पन्नासाठी मधमाशांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले. ग्रामीण युवकांनी मधमाशी पालनाकडे स्वयंरोजगाराच्या दृष्टीने पाहण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. डॉ. पी. एन. जोगदंडे यांनी मधमाशांचे परागीभवनातील महत्त्व स्पष्ट करून शेती उत्पादन वाढीतील त्यांचे महत्त्वाचे योगदान असल्याचे सांगितले. डॉ. एस. एस. वाघ यांनी मधमाशांचे रोग व त्यांचे नियंत्रण याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. के. व्ही. देशमुख यांनी मधमाशांचे संवर्धन ही काळाची गरज या विषयावर पर्यावरण संरक्षण अन्नसुरक्षा व शाश्वत शेतीमध्ये मधमाशांची भूमिका यावर मार्गदर्शन केले. डॉ. के.व्ही. देशमुख व श्री. प्रसाद गांगुर्डे यांनी मधमाशी पालनाचे प्रात्यक्षिक सादर केले. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. एस.एस. वाघ व डॉ. के.व्ही. देशमुख यांनी केले तर सहसंयोजन डॉ. डी.बी. सूर्यवंशी यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. डी.बी. सूर्यवंशी यांनी केले. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी श्री. विशाल जाधव, श्री. खोंडे व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

**प्रकाशक** : **डॉ. गोरक्ष ससाणे**
संचालक, विस्तार शिक्षण

**प्रमुख संपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र

**सहसंपादक** : **श्री. सुनिल राजमाने**
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र

**डिझाईनर** : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २९७०/२०२६**